# मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर, २०२०

पृष्ठे ६८ किंमत : रु.१५

वर्ष विसावे

अंक नववा



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ सप्टेंबर २०२० ◆ वर्ष विसावे ◆ अंक नववा

**संपादक**
सुनील मेहता
**कार्यकारी संपादक**
शंकर सारडा
**संपादन साहाय्य**
योजना यादव
**मुखपृष्ठ सौजन्य**
विशाल महाजन
**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**
*मेहता पब्लिशिंग हाऊस*


## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **विशेष लेख** | ९ |
| **साहित्यवार्ता** | १२ |
| **श्रद्धांजली** | १६ |
| **बोलू मराठी कौतुके** | २२ |
| **चर्चेतील पुस्तक** | २६ |
| **पुस्तक परिचय** | |
| हल्दिराम | ३६ |
| चर्चिलच्या पाऊलखुणा | ४० |
| समर्पण | ४४ |
| सुरम्य सूर्यास्त | ४६ |
| हरित युद्धे | ४८ |
| छोट्या शहराचा दर्या | ५४ |
| साद घालतो कालाहारी | ५८ |
| **संकीर्ण** | ६१ |
| **दिनविशेष** | ६२ |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

संपादकीय

**अब तो इस तालाब का पानी बदल दो**
**ये कँवल के फूल कुम्हलाने लगे हैं**

दुष्यंत कुमार यांच्या या ओळी म्हणजे साचलेपणाच्या मानसिकतेवरचं परखड भाष्यच. असंच साचलेपण आपण गेले सहा महिने अनुभवत आहोत. इतकं की मनातलं फूल कसं जपायचं हेच कळेनासं झालं आहे. रोज नव्या आव्हानांची मालिका पुढ्यात उभी राहत आहे. आणि तरी आपण बोगद्याच्या शेवटी प्रकाश असेल, अशी आस ठेवून बोगदा संपायची वाट पाहत आहोत.

कोरोना काळात आपण आपल्या लाडक्या इरफान खान, ऋषी कपूर, सुशांत सिंग राजपूतपासून राहत इंदौरींसारख्या दिग्गज कलावंतांना गमावलं. हे भयाचं सावट वाढत असताना कोरोनावरच्या लसीच्या यशस्वी चाचण्यांच्या सकारात्मक बातम्याही आल्या. आता तोच सकारात्मक धागा सोबत घेऊन आपण भविष्याकडे पाहू शकतो. जीवनाचं चाक पुन्हा रुळावर येत असताना स्वतःतली ऊर्जा कायम ठेवायची तरी पुन्हा कामाला लागायला हवं. त्यासाठीच आम्ही नव्याने पुस्तकांचं विश्व समृद्ध करण्यासाठी सज्ज झालो आहोत.

अनुवादाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय साहित्य मराठीत येण्याचं प्रमाण लक्षणीय आहे; पण त्या तुलनेत भारतीय भाषांमधील संवाद अपुरा आहे. त्यासाठी मेहता पब्लिशिंग हाऊसनं एक पाऊल पुढे टाकत पेरूमल मुरगन यांच्या नऊ पुस्तकांचा थेट तमिळमधून मराठीत अनुवाद करण्याचा

निर्णय घेतला आहे. यात त्यांच्या काझीमुगम, पोक्कुझी, कुलामाठारी अशा साहित्यकृतींचा समावेश असेल. याशिवाय प्रादेशिक भाषेतील संवाद वाढविण्याचा प्रयत्नही पब्लिशर्स एक्सचेंज या गटाच्या माध्यमातून केला जात आहे. शिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय भाषांमधील पुस्तके पोहचविण्यासाठीही विशेष प्रयत्न होत आहे. फिजिकल डिस्टन्सिंगमुळे फ्रँकफर्टसारखा आंतरराष्ट्रीय साहित्य मेळावा ऑनलाइन घेतला जात आहे. त्यामुळे प्रवास खर्च आणि इतर खर्च परवडत नसल्याने या मेळाव्याला उपस्थित न राहू शकणाऱ्यांनाही यंदा याचा लाभ घेता येण्याची शक्यता आहे. हीसुद्धा सध्याच्या निराशाजनक वातावरणात एक आशादायी बाब आहे.

कोरोना काळात इतर सर्व व्यवसायांप्रमाणे प्रकाशन व्यवसायालाही मोठा फटका बसला. सर्व व्यावसायिक आपापल्या परीने यातून सावरण्याचा प्रयत्न करत आहेत; पण कोरोनामुळे संकटात सापडलेल्या प्रकाशन व्यवसायाला इटली सरकारनं भरघोस पाठबळ दिलं आहे. ग्रंथालयांच्या पुस्तक खरेदीसाठी £३०,०००,०००, पुस्तक विक्रेत्यांसाठी कर सवलतीच्या रूपात £१०,०००,००० आणि कोरोनामुळे आर्थिक विवंचनेत अडकलेल्या छोट्या प्रकाशकांसाठी £१०,०००,००० असे या मदतीचे स्वरूप आहे. आशा आहे इटली सरकारची प्रकाशन व्यवसायाप्रतिची ही बांधिलकी आणि इटली सरकारचं हे पाऊल इतर देशांसाठीही दिशादर्शक ठरेल. भारतातील, किंबहुना, महाराष्ट्रातील प्रकाशन व्यवसायाच्या बळकटीसाठी अशा प्रयत्नांची गरज आहे. आणि कालौघात ते होतील, अशी आस बाळगायला हरकत नाही.



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

## डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

## सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

## WORDPOWER

### बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**

**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

विशेष लेख

## वाघाच्या काळजाचा प्रकाशक : अनिलभाई मेहता

- डॉ. रवींद्र ठाकूर

माझे वडील शिक्षक असले तरी घरात साहित्यानिर्मिती वगैरे असली काही परंपरा नव्हतीच. एक मात्र घडले की, त्यांना वाचायची आवड होती. त्यामुळे मीही वाचनवेडा बनलो आणि शालेय वयापासून जाडजूड पुस्तकं वाचू लागलो. पुढे असाच धडपडत धडपडत प्राध्यापक झालो; परंतु म्हणावं तसं स्थैर्य लाभलं नाही.

नोकरीसाठी वणवणत असताना एका मुलाखतीच्या निमित्ताने डॉ. आनंद यादव यांची भेट झाली. त्यांच्यामुळे नोकरीला लागलो अन् पुढे त्यांच्याकडेच र. वा. दिघे यांच्या कादंबरीवर पीएचडीसाठी नाव नोंदवलं. त्या निमित्ताने झालेला माझा अभ्यास पाहून सर म्हणाले की, तुम्ही ग्रामीण कादंबरीचा इतिहास का लिहीत नाही? त्यावर मी म्हटलं की मी लिहीन; पण छापणार कोण? त्यावर ते म्हणाले की, ते माझ्यावर सोपवा. झालं, 'आंधळा मागतो एक डोळा...' तसं माझं झालं. अभ्यास झालेला होताच. झरझर सगळं लिहून काढलं आणि हस्तलिखित सरांकडे सोपवलं आणि यथावकाश 'मराठी ग्रामीण कादंबरी' हा ग्रंथ मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाला. त्यापूर्वी कविमित्र फ. म. शहाजिंदे यांच्या सहकार्यामुळे माझा 'अनिकेत' हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला होता; परंतु एका मान्यवर प्रकाशन संस्थेमार्फत पुस्तक यावं हा आनंद वेगळाच होता. तेव्हापासून अनिलभाई मेहता यांच्याशी ऋणानुबंध जडला तो कायमचाच. त्यानंतर 'कादंबरीकार र. वा. दिघे' हा ग्रंथही त्यांनीच प्रकाशित केला.

'महात्मा' या कादंबरीचे त्यांनी केलेले प्रकाशन ही माझ्या

जीवनातील महत्त्वाची घटना ठरली. पुस्तकाचे मोल जाणावे ते अनिलभाई यांनीच. या कादंबरीच्या आजवर चार आवृत्त्या प्रकाशित झाल्या असनू, तिचा हिंदी आणि इंग्रजी अनुवादही प्रकाशित झाला आहे. आता तर ती ई-बुक या स्वरूपातही आली आहे. या कादंबरीच्या प्रकाशनाचा इतिहास सांगण्यासारखा आहे. 'महात्मा'चे हस्तलिखित अनिल किणीकर यांच्याकडे गेले होते. त्यांना फुलेकृत ब्राह्मणांवरील टीका फारच खटकली होती. त्यांनी मला बोलावून घेऊन सरळ सांगितलं की, एवढी टीका वगळणार असाल तर हे पुस्तक आम्ही स्वीकारू. मी त्यांना सांगितलं की, ती टीका ब्राह्मणांवर नसून ब्राह्मण्यावर आहे. तसं असतं तर फुल्यांना ब्राह्मण मित्रांनी जे सहकार्य केलं ते केलंच नसतं; पण त्यांचं समाधान झालं नव्हतं. शेवटी मी अनिलभाई यांना भेटून हस्तलिखित परत मागितलं. त्यावर ते म्हणाले की, थोडं थांबा. त्यानंतर त्यांनी ते हस्तलिखित मोहन वेल्हाळ यांच्याकडे दिलं. हस्तलिखित वाचनू वेल्हाळ त्यांना म्हणाले की, अहो, हे तर सोनं आहे. हे पुस्तक हातचं जाऊ देऊ नका. हस्तलिखित वेल्हाळ यांच्याकडे सोपवण्यामागील अनिलभाईंची नीरक्षीर दृष्टी दिसनू आली हे खरंच; कारण त्या हस्तलिखिताचं खरं मोल कोण जोखू शकेल हे त्यांनी ओळखलं होतं. वेल्हाळ यांनीही हस्तलिखित चांगलं घासून पुसून घेतलं. सकारात्मक दुरुस्त्या झाल्यानंतरच 'महात्मा' प्रकाशित झाली आणि अशाप्रकारे माझी सुमारे सात वर्षांची मेहनत फळाला आली. 'महात्मा'ला योग्य तोच संपादक आणि प्रकाशक मिळाला याचा मलाही फार आनंद झाला.

'महात्मा'चा प्रकाशन सोहळाही तेवढाच संस्मरणीय ठरला. गुरुवर्य नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली आणि हरी नरके यांच्या प्रमुख उपस्थितीत शाहू स्मारक भवनात झालेल्या त्या सोहळ्याला खास करून माझे आई-वडीलही गावाकडून आले होते. कोल्हापुरातील अनेक मान्यवरही आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने 'सकाळ', 'पुढारी' आदी स्थानिक वृत्तपत्रांनी रविवार पुरवणी अंकात कादंबरीतील काही अंश प्रकाशित केले होते, हे नमूद केलेच पाहिजे; कारण त्यामुळे प्रकाशन समारंभाविषयीचे वातावरण तयार होण्यास बरीच मदत झाली होती. त्या सोहळ्याची निमंत्रण पत्रिका मी आजही जपून ठेवलेली आहे.

कोत्तापल्ले सर म्हणाले होते की, एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर प्रकाशित होत असलेली 'महात्मा' ही कादंबरी अनेक दृष्टींनी महत्त्वाची आहे. नव्या सहस्रकातील सामाजिक चळवळींना बळ देण्याचे कार्य 'महात्मा' ही कादंबरी करेल, असा निर्देश करून हरी नरके म्हणाले होते की, कादंबरीत शोधू म्हटले तरी एकही चूक सापडत नाही आणि दुसरे म्हणजे लेखकाने अनेक प्रसंग असे रंगविले आहेत की डोळ्यांतून पाणी आल्याशिवाय राहत नाही. अनिलभाई म्हणाले, 'महाराष्ट्रातल्या एवढ्या मोठ्या व्यक्तिमत्त्वावरची कादंबरी प्रकाशित

करणं ही जबाबदारीची गोष्ट होती. पहिल्यांदा आम्ही ही कादंबरी नाकारली होती; परंतु कादंबरी चांगली व्हावी म्हणनू ठाकुरांनी घतेलेले परिश्रम पाहून मोहन वेल्हाळ यांच्याशी चर्चा करून आम्ही हा निर्णय घेतला.' मनोगत व्यक्त करताना मी म्हणालो होतो की, मला असा तसा प्रकाशक नकोच होता; तर वाघाच्या काळजाचा प्रकाशक हवा होता; कारण 'महात्मा' प्रकाशित करणं हे मोठं धाडसाचं काम होतं; कारण तिच्यामुळे परंपरावाद्यांना मोठं आव्हान दिलं जाणार होतं. आणि झालंही तसंच. संपूर्ण महाराष्ट्राने 'महात्मा' डोक्यावर घेतली; परंतु उच्चवर्णीय आणि प्रस्थापित म्हणवणाऱ्या एकाही समीक्षकाने तिची दखल घतेली नाही आणि अजूनही घतेलेली नाही. मीही ती अपेक्षा ठेवत नाही. म्हातारीने कोंबडं झाकलं म्हणून का सूर्य उगवायचा थांबणार आहे?

प्रकाशित होताच कादंबरी गाजू लागली. बहुचर्चित ठरली. आकाशवाणी कोल्हापूर आणि सोलापूर या केंद्रांवरून तिचे क्रमशः वाचनही प्रसारित झाले. असाच एकदा अचानक मुंबईहून महेश भारतीय या गृहस्थाचा फोन आला. त्याला 'महात्मा' वर दूरदर्शन मालिका बनवायची होती. त्यासाठी तो कोल्हापूरलाही येऊन गेला. माझी परवानगी घेऊन त्याने पहिला भागही शूट केला; परंतु दूरदर्शनवरील अधिकाऱ्यांनी त्याचा तो प्रयत्न हाणून पाडला. कोल्हापुरात साहित्य चर्चा मंडळाचे तु.द. कुलकर्णी यांनी 'महात्मा'वर चर्चासत्र घडवून आणले. हा अनुभवही संस्मरणीय ठरला; कारण प्राचार्य कटाबळे, वैजनाथ महाजन असे मान्यवर 'महात्मा'वर भरभरून बोलले. वैजनाथ महाजन म्हणाले होते की, बऱ्याच दिवसांनी एक चांगली वैचारिक कादंबरी आली आहे. तिचे आपण मनापासनू स्वागत केले पाहिजे. 'महात्मा' नंतरच्या माझ्या 'धर्मयुद्ध', 'व्हायरस' या कादंबऱ्याही मेहता पब्लिशिंग हाऊसनेच प्रकाशित केल्या.

'महात्मा'ला मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे दिला जाणारा रणजित देसाई पुरस्कारही मिळाला. ती शिफारस बहुधा माझे गुरू आनंद यादव आणि अनिलभाई यांचीच असावी यात मला तरी शंका वाटत नाही. हे सगळं घडलं ते अनिलभाईंच्या गुणग्राहकतेमुळे हे मी विसरू शकत नाही. साहित्याची निवड करताना त्यांच्याकडे फक्त गुणवत्ता हाच निकष असतो. नाहीतर आपल्या प्रकाशन संस्था आणि साहित्य संस्था गटबाजीने किती पोखरलेल्या आहेत हे वेगळे सांगायची गरज नाही. त्यामुळेच मेहता पब्लिशिंग हाऊस ही प्रकाशनसंस्था आज मराठी साहित्य प्रकाशित करणारी आघाडीची प्रकाशन संस्था ठरली आहे. अनिलभाईंनी निर्माण केलेली ही उज्ज्वल परंपरा आज त्यांचे सुपुत्र सुनीलभाई आणि नातू अखिलभाई पुढे नेत आहेत. त्यांना हार्दिक शुभेच्छा!

✦

साहित्य वार्ता

## पुस्तकांच्या पायरसीविरोधात एल्गार

**पुस्तकांच्या पायरसीसंदर्भात अनेकवेळा अनेक माध्यमांतून आवाहन करूनही फायदा होत नसल्याने मेहता पब्लिशिंग हाऊसने पोलीस यंत्रणेसोबत केंद्र व राज्यसरकारकडे हा मुद्दा लावून धरला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक सुनील मेहता यांनी यासंदर्भात पंतप्रधान कार्यालयाकडे तक्रार नोंद केली आहे. शिवाय महाराष्ट्र शासनाकडेही तक्रार पाठवली आहे.**

पुस्तकांची पीडीएफ प्रत शेअर करणे किंवा मागणी करणे, हा कॉपीराईट कायद्यानुसार गुन्हा असल्याचे प्रकाशक व जाणकारांकडून अनेकदा सांगण्यात आलेले आहे. मात्र पुस्तकांच्या पीडीएफ कॉपी विकण्याच्या बेकायदीशीर व्यवसायाची मोठ्या प्रमाणात चलती आहे. यावर पुस्तकांच्या पीडीएफ वितरित करण्यावर मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे पुणे येथील खडक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. अशा बेकायदेशीर व्यवसायांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रकाशकांकडून आता थेट मुख्यमंत्री व पंतप्रधान कार्यालयाकडे तक्रार नोंदवली जाणार आहे.

एका व्यक्तीकडून मराठीतील पुस्तकांचा खजिना खरेदीसाठी २९९ रुपये या नंबरवर ऑनलाइन ट्रान्सफर करा,

पेमेंट पूर्ण झाल्यावर स्क्रीनशॉट आणि तुमचा ई-मेल आयडी, नाव, मोबाईल नंबर आणि शहराचे नाव पाठवा. ई बुकची लिंक तुम्हाला ई-मेलवर पाच मिनिटांमध्ये पाठवली जाईल, असा मेसेज व्हायरल केला जात आहे. यामध्ये 'ययाति,' 'राधेय,' 'मृत्युंजय,' 'एक होता कार्व्हर,' 'श्यामची आई' अशा अनेक पुस्तकांचा समावेश आहे.

मेहता यांनी 'लोकमत'ला सांगितले की, संबंधित मेसेज मिळताच मी त्या क्रमांकावर फोन करून विचारणा केली, तेव्हा 'पीडीएफ वितरित करणे हा गुन्हा असल्याचे मला माहीत नव्हते. मी या क्षेत्रात नवीन आहे.' असे त्या व्यक्तीने सांगितले. त्याला समज देऊन मी खडक पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली; मात्र त्या व्यक्तीने अजूनही हा प्रकार थांबवला असेल असे वाटत नाही. कारण, सर्व पुस्तकांच्या पीडीएफ त्याच्याकडे उपलब्ध आहेत.

याबाबत मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री व पंतप्रधान कार्यालयाला पत्र पाठवणार आहे. लॉकडाऊनमुळे सध्या पुस्तकांच्या पीडीएफ कॉपी ऑनलाइन वितरित केल्या जात आहेत. सर्व व्यवहार सुरळीत सुरू झाले की रस्त्यावर, पदपथावर पायरेटेड पुस्तकांची विक्री पुन्हा सुरू होईल. हे थांबविण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. यामुळे प्रकाशकांचे नुकसान आहेच; मात्र इन्कम टॅक्स, सेल्स टॅक्स, जीएसटीचेही नुकसान होत आहे. १०-२०टक्के पायरसीमुळे शासनाचे कोट्यवधींचे नुकसान होत आहे. हे प्रकार रोखण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी एक आदेश काढला तर फरक पडू शकेल.

– साभार दै. लोकमत

## सुधा मूर्तींनी उलगडला आपला जीवनप्रवास

इन्फोसिस फाउंडेशनच्या प्रमुख **सुधा मूर्ती** एबीपी माझाच्या 'माझा कट्टा'वर... रंगतदार गप्पांची रंगली ऑनलाइन मैफल

इन्फोसिस फाऊंडेशनच्या प्रमुख, थोर सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका सुधा मूर्ती म्हणजे अनेकांचे प्रेरणास्थान. त्यांचा जीवनप्रवास आजवर अनेक माध्यमातून वाचकांसमोर येत राहिला आहे. त्यांची रसपूर्ण कथनशैली



आणि समृद्ध अनुभवविश्व वाचकांना नेहमीच आकर्षित करतं. हाच अनुभव त्यांच्या एबीपी माझा वृत्तवाहिनीवरील ‘माझा कट्टा’च्या मुलाखतीदरम्यान आला. या ऑनलाइन मुलाखतीत त्यांनी त्यांच्या मराठी पुस्तकांचा प्रवासही स्पष्ट केला.

सुधा मूर्ती यांनी इन्फोसिस फाउंडेशनच्या माध्यमातून केलेल्या सामाजिक कार्याची महती जगभर पोहचली आहे. एक इंजिनिअरिंग केलेली युवती ते आजच्या सुधा मूर्ती या प्रवासाच्या त्यांच्या आठवणी आपण अनेकदा ऐकल्या आहेत; पण प्रत्येक वेळी या आठवणी नवा अनुभव देतात. एबीपी माझावरील त्यांच्या मुलाखतीत हाच अनुभव आला. संपादक राजीव खांडेकर आणि वृत्तवाहिनीच्या टीमने ही मुलाखत घेतली. या मुलाखतीवेळी सुधाताईंनी आपले पुण्यातील दिवस आणि त्यावेळच्या रम्य आठवणींना उजाळा दिला. पुण्यातील ‘रूपाली’मधल्या नारायण मूर्तींसोबतच्या त्यांच्या भेटीगाठी आणि त्याचे धमाल किस्से यावेळी सुधाताईंनी सांगितले. जेआरडी टाटांना सुधाताईंनी लिहिलेलं पत्र आणि त्यानंतर त्यांनी दिलेली संधी या आठवणीही त्यांनी नमूद केल्या.

या मुलाखतीवेळी सुधाताईंच्या मराठी अनुवादित पुस्तकांवरही चर्चा झाली. त्यांच्या पुस्तकांच्या मराठी अनुवादाचे श्रेय त्यांनी अनुवादिका लीना सोहोनी आणि मेहता पब्लिशिंग हाऊसला दिले. लीना सोहोनी माझ्या पुस्तकांच्या यशोदा आहेत, अशा शब्दांत त्यांनी त्यांचा गौरव केला.

✦

## इटली सरकार धावलं प्रकाशकांच्या मदतीला...

टाळेबंदी आणि दळणवळण क्षेत्रावरील निर्बंधांमुळे जगभरातील प्रकाशन व्यवसाय संकटात सापडला आहे. गेल्या सहा महिन्यांत व्यवसायाची अगणित हानी झाली आहे. अशा वेळी इटलीच्या सरकारने प्रकाशकांना मदतीचा हात पुढे केला आहे. इटली सरकारने भरघोस आर्थिक

मदतीसोबतच पुस्तकांना जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत समाविष्ट केल्याने इटलीतील प्रकाशन व्यवसायाला मोठा हातभार लागणार आहे.

कोरोना काळात इतर सर्वच व्यवसायांप्रमाणे प्रकाशन व्यवसायालाही मोठा फटका बसला. सर्व व्यावसायिक आपापल्या परीने यातून सावरण्याचा प्रयत्न करत आहेत; पण कोरोनामुळे संकटात सापडलेल्या प्रकाशन व्यवसायाला इटली सरकारनं भरघोस पाठबळ दिलं आहे. ग्रंथालयांच्या पुस्तक खरेदीसाठी £३०,०००,०००, पुस्तक विक्रेत्यांसाठी कर सवलतीच्या रूपात £१०,०००,००० आणि कोरोनामुळे आर्थिक विवंचनेत अडकलेल्या छोट्या प्रकाशकांसाठी £१०,०००,००० असे या मदतीचे स्वरूप आहे. आशा आहे इटली सरकारची प्रकाशन व्यवसायाप्रतिची ही बांधिलकी आणि इटली सरकारचं हे पाऊल इतर देशांसाठीही दिशादर्शक ठरेल. भारतातील आणि किंबहुना महाराष्ट्रातील प्रकाशन व्यवसायाच्या बळकटीसाठी अशा प्रयत्नांनी गरज आहे. आणि कालौघात ते होतील, अशी आस बाळगायला हरकत नाही.

✦





eBooks

मोबाइलमध्ये बनवा समृद्ध
लायब्ररी ई-बुक्सचा खजिना
आला तुमच्या दारी...

आपली लाडकी पुस्तकं...
कधीही... कुठेही...
e-bookच्या रूपात

मराठीतल्या दिग्गज लेखकांपासून
लिहित्या सर्जनांपर्यंत हजारो
पुस्तके एका क्लिकवर...

श्रद्धांजली

## राम प्रधान : सनदी अधिकारी ते लेखक...

– अविनाश पंडित

माजी सनदी अधिकारी राम प्रधान यांचं नुकतंच निधन झालं. राम प्रधान हे चांगले लेखकही होते. त्या अनुषंनगाने ते मेहता पब्लिशिंग हाऊस परिवाराशी जोडले गेले. राम प्रधान यांच्या पुस्तकांवर काम करताना ज्येष्ठ संपादक अविनाश पंडित यांना त्यांना जवळून अनुभवता आले. त्यांचे हे विलक्षण अनुभव राम प्रधान यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकतात.



'पहिली फेरी (१९६५ भारत-पाक युद्ध)' हे मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेले, वरिष्ठ सनदी अधिकारी, दिवंगत राम प्रधान यांचे पुस्तक आहे. काश्मीर प्रश्नावरून भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये झालेल्या प्रमुख युद्धांच्या वैशिष्ट्यांचे विश्लेषण या पुस्तकात केले गेले आहे.

पाकिस्तानच्या निर्मितीपासूनच काश्मीर कोणाचे हा विवाद सुरू आहे. संयुक्त राष्ट्रांत हा वाद अद्याप सुटलेला नाही. पाकिस्तानने मुख्यत्वे टोळीयुद्ध करून भारतातील जम्मू आणि काश्मीर या राज्यांचा तुकडा तोडला.

अनेक वर्षे, विविध प्रकारे कुरापती काढून काहीच हाती लागत नाही पाहिल्यावर, पाकिस्तानने काश्मीरमध्ये प्रथम

घुसखोरी करून आणि नंतर लष्करी हल्ला करून युद्ध छेडले

'पहिली फेरी...' या पुस्तकाच्या जन्माची गोष्ट आगळीवेगळी आहे. जानेवारी २००२मध्ये अनिलभाई मेहता यांनी मला, राम प्रधान यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या रोजनिशीच्या आधारे सप्टेंबर १९६५ मध्ये झालेल्या भारत- पाकिस्तान युद्धावर टिपणे काढली आहेत असा निरोप दिला. या टिपणांच्या मदतीने प्रधान हस्तलिखित तयार करत होते. ते हस्तलिखित मिळवून पुस्तक प्रकाशित करता येईल की नाही याची मी चाचपणी करायची होती.

पाकिस्तान विरुद्ध १९६५च्या सप्टेंबरमध्ये जे युद्ध झाले ते २२ दिवस चालले. हे युद्ध चालू असताना यशवंतरावांनी आपल्या रोजनिशीत रोजच्या घटना, युद्धाचे बदलते स्वरूप, घटनांमागील कारणे इत्यादी मुद्दे तपशीलवार लिहून ठेवले होते. तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना विचारण्या-अगोदर शत्रूच्या वाढत्या आक्रमणामुळे आणि त्यामुळे उद्भवलेल्या गंभीर परिस्थितीमुळे यशवंतराव यांनी युद्ध घोषित केले होते.

प्रधान सरांचे हे टिपण पुस्तक होण्याच्या दृष्टीने फारच लहान होते. पुन्हा हे युद्ध होऊन बराच काळ लोटला होता आणि पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते. पुढे १९७१मध्ये पाकिस्तान विरुद्ध बांगलादेश निर्मितीच्या वेळी पाकिस्तान विरुद्ध काश्मीर खोऱ्यात लष्करी संघर्ष झाला आणि १९९९मध्ये कारगिलचे युद्ध हे काश्मीरच्या संबंधातच होते.

या सर्व लष्करी, नागरी चढाईच्या कारवाया, गनिमी युद्ध यांचा एकत्रित विवेचनात्मक आणि विश्लेषणात्मक आढावा घेतल्यास तो इतिहास, भूगोल, युद्धशास्त्र, सामरिकशास्त्र, राजनीती वगैरे अनेक शाखांच्या अभ्यासकांना एक संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडेल असे मला वाटले. तसे मी प्रधान सरांना बोलूनही दाखविले. स्वातंत्र्यानंतर कारगिल युद्धापर्यंतच्या सर्व घटना रीतसर मांडल्या की एक महत्त्वाचा दस्तऐवज तयार होईल ही सूचना प्रधानसरांना आवडली. प्रधानसरांनी या विषयावरील इंग्रजी पुस्तकाचा संकल्प अगोदरच पूर्ण केला होता. इंग्रजी पुस्तकाच्या दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या होत्या. भारतीय आणि परदेशी लष्करी वर्तुळात या इंग्रजी आवृत्तीचे दिमाखदार स्वागत झाले होते.

परंतु परदेशातील एका तज्ज्ञांच्या प्रश्नाने प्रधान सर काहीसे अस्वस्थ

झाले होते. ‘I feel that your book is doctored’ एकाने असा शेरा मारला. त्यामुळे आम्ही मराठी संस्करणात यशवंतरावांच्या रोजनिशीतील युद्धाशी संबंधित पाने समाविष्ट करण्याचे ठरविले. पोहे, शिरा इत्यादींची सोबत असणाऱ्या आमच्या बैठकीत असे अनेक निर्णय आम्ही घेतले. अशाच एका चर्चेमधून मजकुराला नकाशांची जोड देण्याचे ठरले आणि मजकूर, विशेषतः युद्ध क्षेत्राच्या संदर्भातील, अधिक अर्थपूर्ण झाला. प्रशासन सेवेतील अनुभव, अभ्यासू वृत्ती, सोप्या भाषेत आशय समजावून द्यायची हातोटी, ‘आपण निवेदन करत आहोत ते वाचकाला नीट उमगेल ना’ हे तपासून पाहण्याची सवय या गोष्टींमुळे त्यांचे लेखन फुलत असे.

लोक कशातून कसा अर्थ काढतात, अगदी डोके हलविण्यापासून या-बाबत त्यांच्याकडे अनेक मनोरंजक किस्से होते.

लेखक आणि संपादक यांचे नाते नाजूक असते. आपल्यापेक्षा अनुभवाने आणि ज्ञानाने संपन्न असलेल्या लेखकाला एखादी गोष्ट पटवून देणे हे काहीसे कौशल्याचे काम असते. (डॉक्टरांच्या गळी कंपनीचे नवे उत्पादन उतरविणाऱ्या मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हसारखे हे काम असते.) लेखक संपादकाला समजावून घेणारा असला तर किती प्रभावी पुस्तक तयार होऊ शकते याचा मी अनेक वेळा अनुभव घेतला आहे. प्रधान सरांचे पुस्तक हे असेच एक समाधान करणारे उदाहरण होय.

✦


**राम प्रधान यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके**




पहिली फेरी
(१९६५ भारत-पाक युद्ध)




वादळमाथा ते १९६५
भारत-पाक युद्ध




माझी वाटचाल :
मेटकॉफ हाउस ते राजभवन

## विजया जहागीरदार... आई ते लेखिका

ज्येष्ठ लेखिका विजया जहागीरदार यांचं नुकतंच निधन झालं. त्यांची कन्या संगीता सोमण यांनी जागवलेल्या त्यांच्या आठवणी...



माझ्या जन्मानंतर आईचा लेखनप्रवास सुरू झाला. त्यामुळे लहानपणापासून शाळेकरता भाषणे लिहिणे, छोट्या कविता करून देणे, हे आईचं काम असायचं. रामायण, महाभारतातील कुठलीही कथा, कुठलेही पात्र, त्यांची नावे, पुराणे सगळं आई सांगायची; पण तेव्हा आपली आई लेखिका वगैरे आहे असं काही माहीत नव्हतं. हे सर्व करणं, माहीत असणं, हे आईचं कामच असतं, अशी भावना!

हळूहळू कळायला लागलं की, आईचं वाचन दांडगं आहे. ती काव्यगायन, काव्यवाचनाचे कार्यक्रमही करते.

माझ्या आठवणीत आई मोकळ्या वेळात नेहमी लेखन करत असायची. त्यामुळे घरात गप्पा पण साहित्यावरच जास्त असायच्या. कधी साड्या, दागिने, खरेदी अशा गोष्टींमध्ये तिला रसच नव्हता.

जसा काळ पुढे सरकला तसं आईचं लेखनही.

कथा, कादंबऱ्या, चरित्रलेखन, वडिलांच्या नोकरीच्या निमित्ताने फिरणं खूप झालं, त्यामुळे ग्रामीण भाषेतील साहित्यही तिच्याकडून लिहिलं गेलं. मग बालसाहित्य! मी शाळेतून घरी आले, आईच्या हातात कागद दिसला की पलंगाखाली लपून बसायचे! कारण तिने रचलेली लहान मुलांची कोडी सोडवायला मी तिची पहिली उमेदवार असायचे; पण या सर्व वाङ्मयामध्ये तिचं आवडतं बाळ म्हणजे गेय, छंदबद्ध कविता. घरात नाही तर घराण्यात कोणाचं लग्न असेल तर मंगलाष्टक, बारशासाठी पाळणा लिहिणं हे तर पाच-दहा मिनिटांचं काम!

आजोबा चंद्रशेखर गोऱ्हेंचा वारसा तिने सिद्धपणे चालवला आणि आता काळाच्या पुढे निघून गेली.

माझ्या धाकट्या मुलीच्या लग्नाकरता मात्र मंगलाष्टकं लिहायची राहून गेली... त्याला आता आई नाही...

एका प्रेमळ गावात जन्मलेली
आणि एका कडक घरात लग्न करून आलेली...
आमची आई
साहित्यात प्रेम शोधणारी आणि
प्रेमात साहित्य बांधणारी...
आमची आई
हिशोब चोख करणारी...
तरीही बेहिशोबी प्रेमाचा वर्षाव करणारी...
आमची आई
प्रत्येक परिस्थितीत प्रेमच करणारी...
ती आमची आई...

✦


**TBC - 29 Book No. 1**

## एचएमएस युलिसिस




**ॲलिस्टर मॅक्लीन**

अनुवाद : **अनिल काळे**

शब्दांचा जादूगार ॲलिस्टर मॅक्लीनच्या कुंचल्यातून साकारलेली... मृत्यूचा अविरत सामना करत सागरी आव्हानांशी दोन हात करणाऱ्या दुसऱ्या महायुद्धातील सैनिकांची शौर्यगाथा ..

**किंमत : ४५०/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**

**TBC - 29 Book No. 2**

**नवं कोरं**

# चेसिंग टुमॉरो




**सिडनी शेल्डन**

अनुवाद : **टिली बॅगशॉ**

सिडने शेल्डनच्या कल्पक साहित्यबीजातून साकारलेली ट्रेसी आणि तिच्या अद्भुत साहसांची उत्कंठावर्धक कथा...

**किंमत : ४५०/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**

**TBC - 29 Book No. 3**

**नवं कोरं**

# रिव्हर गॉड




**विल्बर स्मिथ**

अनुवाद : **सुभाष जोशी**

नाइल नदीच्या काठावरील प्राचीन इजिप्तचं वैभव आणि तत्कालीन सौंदर्यवादी विचारसरणीचं प्रतीक असणारी लालित्यपूर्ण कादंबरी...

**किंमत : ७५०/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**

## बोलू मराठी कौतुके

भाषा म्हणजे वाहती नदी. ती काळप्रवाहात येणाऱ्या शब्दांना सोबत घेऊन प्रवाही राहते. कोरोना काळात जगभरच्या भाषांसोबत मराठीतही नव्या शब्दांची भर पडली आहे. त्यातील हे काही शब्द...

| | | |
|---|---|---|
| विषाणू | - | संसर्गजन्य विषाणू जो केवळ सजीव पेशींमध्ये मोठ्या संख्येने वाढतो. |
| कोरोना विषाणू | - | हा एक प्रकारचा विषाणू असून, सर्दीपासून गंभीर आजारापर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या रोगवाढीसाठी कारणीभूत ठरतो. सध्याच्या विषाणूला AIS/SARS-Cov-2 म्हणजेच (Severe Acute Respiratory Syndrome) असे नाव दिले आहे किंवा त्याला 'नोव्हेल कोरोना व्हायरस'ही (Novel Corona virus) म्हणतात. |
| कोविड-१९ | - | नोव्हेल कोरोना व्हायरसमुळे होणाऱ्या रोगाला कोविड-१९ असे म्हणतात. |
| ॲसिम्प्टोमॅटिक | - | असा रुग्ण, की जो कोविडची लक्षणे दाखवीत नाही. मात्र, अशा रुग्णांपैकी काही रुग्ण इतरांना कोविडचे संक्रमण करू शकतात. |

सिम्प्टोमॅटिक - कोविडची लक्षणे दाखविणारा रुग्ण.

क्वॉरंटाईन - जो कोव्हिडचा रुग्ण नाही, मात्र रुग्णाच्या संपर्कात आलेला आहे किंवा जो अशा क्षेत्रातून आलेला आहे की, त्याच्यापासून संक्रमण होण्याची शक्यता आहे. अशा व्यक्तीला इतरांच्या संपर्कापासून दूर ठेवणे म्हणजे विलगीकरण. यामध्ये २ प्रकारचे विलगीकरण आहे.

अ) संस्थात्मक विलगीकरण

ब) गृह विलगीकरण.

✦ देशांतर्गत प्रवास केल्यास शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार १४ दिवस क्वॉरंटाईन किंवा घरी विलगीकरण केले जाते.

✦ आंतरराष्ट्रीय प्रवास करून आले असल्यास ७ दिवस संस्थात्मक (Institutional) क्वारंटाईन एखाद्या खासगी हॉटेलमध्ये करता येते.

✦ सात दिवस विलगीकरण झाल्यानंतर उर्वरित सात दिवस गृह विलगीकरण करण्यास अनुमती आहे.

✦ एखादी व्यक्ती काही कामानिमित्त देशांतर्गत प्रवास करत असेल व तिचा परतीचा प्रवास १४ दिवसांच्या आत असल्यास तशा परतीच्या प्रवासाचा पुरावा दर्शवून या विलगीकरणापासून सूट मिळू शकते.

आयसोलेशन - एखादी व्यक्ती कोव्हिडचा रुग्ण आहे हे सिद्ध झाले आहे, अशा रुग्णापासून रोगाचा प्रसार न होण्यासाठी त्याचे अलगीकरण करणे. असे अलगीकरण हे हॉस्पिटल किंवा शासनाच्या नवीन धोरणाप्रमाणे घरीसुद्धा केले जाऊ शकते. राज्य शासनाच्या दिनांक ६ जून, २०२० रोजीच्या निर्णयाप्रमाणे लक्षणे नसलेला रुग्ण घरी तशी सोय असल्यास स्वत:ला घरीही अलगीकरण करू शकतो. मात्र, अशा रुग्णाला अतिसौम्य किंवा

लक्षणे नसतील, तरच हा पर्याय दिला जातो. अशा व्यक्तींबरोबर दिवसरात्र २४ x ७ काळजी घेणारी व्यक्ती उपलब्ध असली पाहिजे. अशा व्यक्तीने आरोग्य सेतू ॲप डाऊनलोड करणे आवश्यक आहे व शासनाने विहित केलेले प्रतिज्ञापत्र देणेही आवश्यक आहे.

क्वारंटाईन व आयसोलेशन -

ज्ञात रुग्णाला इतर लोकांपासून वेगळे करतात त्याला आयसोलेशन म्हणतात व ज्या व्यक्तीला आजार झालेला नाही; परंतु आजार होण्याची शक्यता आहे अशा व्यक्तीपासून संक्रमण टाळण्यासाठी त्याला क्वारंटाईन केले जाते.

सोशल किंवा फिजिकल डिस्टन्सिंग -

कोरोना व्हायरस हा एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोचतो, संपर्कामुळे त्याचा प्रसार होतो, हा प्रसार थांबविण्यासाठी दोन व्यक्तींमध्ये किमान पाच ते सहा फुटांचे अंतर असणे आवश्यक आहे. त्याला सोशल किंवा फिजिकल डिस्टन्सिंग म्हणतात.

पॅन्डेमिक - एखादा आजार संपूर्ण देश/खंड/जगभर व्यापला असेल त्याला पॅन्डेमिक म्हणतात.

इम्युलोकॉम्प्रोमाईज्ड-अशी व्यक्ती, की ज्याची रोगप्रतिकार शक्ती ही कमी झाली आहे किंवा जवळजवळ संपुष्टात आली आहे.

कम्युनिटी स्प्रेड - अशा प्रकारच्या रोगाचा प्रसार, की जेथे संक्रमण कोठून झाले आहे, त्याचा स्रोत निश्‍चित करता येत नाही, म्हणजेच कोरोनाच्या बाबतीत ज्याने कुठलाही प्रवास केला नव्हता किंवा ज्याचा कुठल्याही रुग्णाशी संपर्क आला नव्हता अशा व्यक्तीला कोरोनाचा प्रादुर्भाव होणे.

कोमोर्बिडिटी Comorbidity -

अशा व्यक्ती, ज्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या व्याधी झालेल्या आहेत. उदा. मधुमेह, उच्च रक्तदाब, मूत्रपिंडाचे विकार, हृदयरोग इ.

इन्क्युबिशन पिरिअड -

एखाद्या रुग्णाला आजार झालेला नाही, प्रत्यक्ष रोगाची लक्षणे दिसेपर्यंतचा कालावधी म्हणजेच त्या कालावधीमध्ये रोग सुप्त अवस्थेत राहतो.

मृत्युदर - प्रत्येक १०० रोग्यांमागे किती व्यक्ती मरण पावतात त्याची आकडेवारी.

पीपीई कीट (Personal Protection Equipment) -

कोरोनाबाधित रुग्णावर उपचार किंवा त्याची सेवा करतात त्या व्यक्तीला रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी घालावयाचा गणवेश.

✦ आर-नॉट R-Naught / आरओ RO- एका व्यक्तीकडून किती व्यक्तींना कोरोनाचे संक्रमण होऊ शकते, त्याची आकडेवारी.

✦ आरटी-पीसीआर तपासणी RT-PCR Test - Real Time Reverse Transcription Polymerase Chain Reaction, रुग्णाला कोरोनाचा प्रादुर्भाव झाला आहे किंवा नाही ते बघण्यासाठी ही चाचणी करतात.

✦




जे अडचणीत असतानाही हसतमुख राहतात, त्यांच्यावर मी प्रेम करतो.

*– लिओनार्दो दा विंची, चित्रकार*

चर्चेतील पुस्तक

## चौंडकं




ही कथा आहे एका देवदासी प्रथेवर. देवदासी म्हणजे देवाला अर्पित. पण खरा अर्थ आहे ‘गावाला अर्पित’..... म्हणजे त्या व्यक्ती- वर कुणाचा ठाम अधिकार नाही तर ती व्यक्ती सर्व गावाची, कुणी यावं आणि भोगावं .... म्हणजे वेश्या ... किंबहुना त्याहून वाईट ... साधारणपणे, मुलांना (मुलगा वा मुलगी) काहीही कळत नसतं त्यावेळी कधीतरी त्यांना देवाला वाहिलं जातं आणि एकदा का हा विधी झाला की मग त्यातून सुटका नाही, अगदी मरेपर्यंत. ही प्रथा अडाणी आणि गरीब लोकांमध्येच पाळली जाते. तरी सुदैवाने, आता या प्रथेवर कायद्याने प्रतिबंध लावले आहेत. परंतु, आजही हजारो जोगते - जोगतिणी आहेत आणि अत्यंत वाईट परिस्थितीत जगत आहेत आणि आजूबाजूचा सधन समाज त्यांचे लचके तोडतोच आहे. मुळात, देवदासी संस्कृतीची परंपरा सातव्या शतकात, कदाचित चोल, चेला आणि पांड्या यांच्या काळात दक्षिण भारतात सुरू झाली असावी. त्यावेळी समाज त्यांच्याशी चांगली वागणूक व आदरभाव ठेवून होता आणि त्यांना समाजात उच्च सामाजिक प्रतिष्ठा होती. त्यांना धार्मिक विधीस उपस्थित राहण्यास वा करण्यास कसलाच मज्जाव नव्हता.

देवदासी, देवरडीयार, जोगतिणी, जोगते वगैरे म्हणजे 'देवाचे सेवक'. हे लोक देवसमर्पित असत आणि त्यांचा देवासोबत विवाह केला जात असे, म्हणजेच ते कोणत्याही 'नश्वर व्यक्ती' बरोबर लग्न करू शकत नाहीत. तथापि, विवाहित आणि अविवाहित पुरुषांपैकी कुणालाही भागीदार निवडण्यास ते स्वतंत्र होते. ही नाती दीर्घ व स्थिर असू शकतात किंवा फक्त थोड्या काळासाठी असू शकतात; परंतु कोणत्याही प्रकारे या महिला त्यांच्या भागीदारांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून नव्हत्या. त्यांना संगीत आणि नृत्य, आणि सुमारे ६४ प्रकारच्या कला शिकवल्या जात. ते मंदिरात किंवा राजसभेत नृत्य-गायन करीत व बक्षीस म्हणून सोने व जमीन मिळवत असत. काहींनी स्वत:ला फक्त देवाला समर्पित करणे निवडले आणि संपूर्ण आयुष्यभर भागीदाराशिवाय राहिले. पण, कालौघात, हे सर्व मागे पडत गेले आणि त्याला आजचे हे अगदी ओंगळ स्वरूप प्राप्त झाले. म्हणजे आजही यांना गोंधळ वगैरेसाठी बोलावून बरंच काही नको ते केलं जातं. चौंडकं कथा : एक गरीब परिवार, सुबान, त्याची पत्नी बायजा, मुलगी सुली आणि म्हातारी आई असे कसेबसे करून खात असतात. त्यांना खूप समस्या असतात, आर्थिक आणि शारीरिक; पण त्यातून त्यांना बाहेर काही पडता येत नाही. त्यातच, सुलीच्या केसात एक जट आढळते आणि गावातील जोगतीण सुलीला यल्लम्मा या देवीला तिला सोडायचा सल्ला देतात. ही जोगतीण सुली पुढं मोठी होते, बबन्याच्या प्रेमजालात अडकते, त्यातून तिला दिवस जातात आणि सरळ साध्या कुटुंबाची पूर्ण वाताहत होते.

**— विजय सरवते**

✦




**कथाकथनाची कथा**

कथा परिणामकारकतेनं कथन करता येणं ही एक कला आहे. ही कला एखाद्या व्रतासारखी जोपासताना आलेल्या अनुभवांचं कथन म्हणजेच 'वपुं'चं 'कथाकथनाची कथा' हे पुस्तक. प्रसिद्ध कवी प्रवीण दवणे यांनी त्यांच्या फेसबुक वॉलवर सांगितलेला हा 'वपुं'चा एक किस्सा.. कॉलेजमध्ये

असताना एका वर्षाला, प्रवीण दवणे सर, त्यांच्या कॉलेजच्या मराठी वाङ्मय मंडळाचे प्रमुख होते; तेव्हा सर्व मुलांनी 'वपुं'ना कार्यक्रमाला आणण्याचा आग्रह धरला. कथाकार आणि कथाकथनकार म्हणून 'वपुं'नी लोकप्रियतेचे शिखर काबीज केले होते (अर्थात, अजूनही वपु तितकेच लोकप्रिय आहेत आणि राहतील). तर, दवणे सरांनी, 'वपुं'ना कार्यक्रमाला बोलविण्यासाठी प्रयत्न करायचे ठरवले. त्यांनी 'वपुं'ना फोन करून कार्यक्रमाबद्दल सांगितलं. 'वपुं'चे मानधन कॉलेजला परवडणारे नसेल याची त्यांना भीती होतीच; आणि ती भीती खरी ठरली. मानधन अपेक्षेपेक्षा दहा पटीने अधिक होते! कॉलेजला तर ते अशक्यच होते! दवणे सर 'वपुं'ना एवढेच म्हणाले, 'वपु, विद्यार्थ्यांना मला लेखकांतील हिमालय दाखवायचेत, आपण नाही आलात तर ते स्पीडब्रेकरला हिमालय समजतील!' दहा सेकंदांचा विराम गेला; नि एकदम वपु म्हणाले, 'मी येतो! तयारीला लागा.' दवणे सर पुढे लिहितात, 'मित्र हो; त्या दिवशी आम्ही वपूर्वाई अनुभवली!' खरंच, काय लिहिलंय प्रवीण सरांनी! 'स्पीडब्रेकरला हिमालय समजतील'! अगदी, सर्वांच्या मनातले भाव व्यक्त केलेत. 'वपु आहेतच हिमालय!' असे अनुभव वाचताना, अंगावर काटा येतो! आपल्या आवडत्या लेखकाला भेटणं, त्यांचे अनुभव ऐकता येणं, ही खरंच भाग्याची गोष्ट आहे. इथे सांगायचं मुद्दा हा की, प्रत्यक्षरीत्या नाही; पण 'वपुं'च्या 'कथाकथनाची कथा' या पुस्तकामधून असाच अनुभव मलाही मिळाला. अगदी योगायोगाने हे पुस्तक हाती आलं आणि एखादा खजिना सापडल्यासारखं झालं. आमचा 'येथे कविता लिहून मिळतील' हा कार्यक्रम सादर करण्यासाठी या पुस्तकामुळेच बळ मिळालंय. या पुस्तकात 'वपुं'नी, त्यांच्या 'कथाकथन' कार्यक्रमानिमित्त त्यांना आलेले चांगले-वाईट अनुभव अगदी दिलखुलासपणे मांडले आहेत. त्यानिमित्ताने, 'वपुं'च्या आयुष्यातील मोठमोठ्या व्यक्तींशी, त्या व्यक्तींच्या विचारांशी आपलीही ओळख होते; आणि एखाद्या कलेसाठी स्वतःला 'झोकून देणे' म्हणजे काय, हे कळतं. तुम्ही कथाकथनकार, कवी, लेखक किंवा कलाकार असाल, तर हे पुस्तक एकदा तरी वाचाच. सामान्य वाचक म्हणून देखील आपल्या आवडत्या लेखकाच्या आयुष्यातील हे अनुभव तुम्हाला हसवतील, अंतर्मुख करतील. कलाकाराने स्टेजमागे खाल्लेल्या टक्केटोणप्यांची जाणीव करून देतील आणि तुमचं अनुभवविश्व समृद्ध करतील. कलेच्या क्षेत्रात

काम करताना येणाऱ्या विविध परिस्थितींना कसं सामोरं जायचं, वातावरणनिर्मिती कशी करावी, एखादा कार्यक्रम करताना काय खबरदारी घ्यावी, कथा कशी निवडावी, ती सादर कशी करावी अशा अनेक प्रश्नांची उत्तरं उदाहरणांसहित यात मिळतील. त्यांच्या पहिल्याच तिकीट लावून झालेल्या प्रयोगाला, 'वसंताचा कार्यक्रम रुपया देऊन कसला ऐकायचा?' असं म्हणत मित्रमंडळी आली. त्यातल्या एका मित्राने रुपया दिला; पण दोन दिवसांनी, 'परवा काही एवढी मजा नाही आली बुवा; रुपया वाया गेला' म्हणत तो रुपया पण परत घेतला. गावोगावी प्रवास करताना, तिकिटांच्या सोयीपासून, राहण्याची व्यवस्था, बुडवलेले मानधन, काही आयोजकांचा तऱ्हेवाईकपणा, फुकटात प्रयोग करत नाहीत म्हणून किंवा असूयेने पसरवलेल्या अफवा यांबद्दल सांगतानाच, श्रोत्यांकडून भरभरून मिळालेल्या दानाबद्दलही ते मोकळेपणाने लिहितात. वपु म्हणतात, 'आपला श्रोता हाच आपला देव. बालगंधर्वांप्रमाणे मी जरी 'मायबाप हो' अशी हाक मारली नाही, तरी मनात भाव तोच आहे.' 'कथाकथनाने काय दिलं?' असं विचारलं की वपु म्हणतात, 'ते शब्दांत कसं मोजता येईल?' पण कृष्णामाईच्या चार हजारांवर श्रोत्यांची उपस्थिती असलेल्या उत्सवात, 'आपण प्रचंड मोठा मंडप उभारू शकतो, हा इथल्या कार्यकर्त्यांचा गर्व तुम्ही उतरवलात,' असे सांगत एका वृद्ध गृहस्थाने व्यक्त केलेला आनंद, 'वपुं'ची 'गार्गी' कथा ऐकल्यानंतर, 'माझ्या मुलाला मराठी माध्यमाच्या शाळेत घातलं, याचा मला अभिमान वाटतो,' हे सांगताना एक डॉक्टरच्या चेहऱ्यावरचा आनंद ,'तुम्ही स्त्रीला ज्या उंचीवर नेऊन ठेवलंय, तसं इतर कोणीच करू शकत नाही,' हा एका स्त्रीचा अभिप्राय, एका टॅक्सीवाल्याने दिवसभर ऐकवलेल्या 'वपुं'च्याच कथा, एका दुकानदाराने 'वपुं'समोरच, त्यांना न ओळखता, 'तुम्ही अगदी 'वपुं'सारखे बोलता' ही दिलेली दाद, त्याचसोबत थोरामोठ्यांची संगत, त्यांनी दिलेली शाबासकीची थाप, अशा अनेक आठवणी या पुस्तकातून आपल्याला भेटतात आणि दवणे सरांना वपु 'हिमालय' का वाटले हे कळतं. जेवढ्या व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती, हे म्हणतात ते खरंच आहे. एखादी व्यक्ती कशी आहे, हे फक्त वरवर पाहून कसं कळणार? 'वपुं'च्या शब्दांत सांगायचं तर, 'माणूस जन्माला येतो तो कोरी पानं घेऊन. त्या पुस्तकाला रॅपर्स चढवली जातात. एकदा हे बुक-जॅकेट चढलं की पोशाखी जगात

मुखपृष्ठाकडे पाहूनच ग्रह करून घेतले जातात. पुस्तकाची पुष्कळशी पानं इतरांसाठीच राखून ठेवलेली असतात. स्वतःला हवा तोच मजकूर लिहिण्याचं भाग्य कोट्यवधी माणसांत एखाद्याचंच.' अशाच अनेक पुस्तकांपैकी 'वपु' एक पुस्तक. आपल्याला त्यांना वाचता येतंय हे आपलं भाग्यच म्हणायचं,नाही का? तुमच्या आहेत का अशा, आवडत्या लेखकांच्या भेटीच्या आठवणी?

**– अश्विनी सुर्वे**

✦




## चाकाची खुर्ची

संघर्ष म्हणजे काय हे जाणून घ्यायचे असेल तर हे आत्मचरित्र जरूर वाचावे, प्रत्येक प्रसंग विचार करायला भाग पाडतो आपल्याला... गेल्या काही दिवसांपूर्वी वाचनासाठी एक आत्मचरित्रपर पुस्तक घेतलं. अतिशय थक्क करणारी कहाणी. आपल्याला अपंगत्व आले पाहून न थकणारी, आजाराला न जुमानणारी, ध्येय गाठण्यासाठी येईल त्या प्रसंगावर मात करणारी एक 'स्त्री' आहे, यावर विश्वास बसणे कठीण आहे. हॉस्पिटलमध्ये आजारपणात आपल्या कमरेखाली मुंग्यांचं थारोळं झालं आहे, हे कळल्यावर किती तो जीव कासावीस झाला, असे वाचूनच अंगावर शहारे आले. अपंगांसाठी काम करताना अनेक प्रवास दौरे, मान्यवरांच्या भेटी असे अनेक प्रसंग आणि त्यांचे वर्णन हे अचंबित करतात. आपल्याला आलेल्या अपंगत्वावर मात करून दुसऱ्यासाठी जगणारी ती दुसरी 'मदर तेरेसा' आहे हे म्हटलं तर वावगं नाही. अपंग संस्थेमार्फत अनेकांना स्वाभिमानाचे आयुष्य जगता यावे आणि त्यांना धैर्य,चिकाटी, प्रेरणा मिळावी, यासाठी त्या सदैव कार्यरत आहेत. अशा अनेक अपंगांची 'आई' एक 'स्त्री' खूप साध्या व सोप्या भाषेत अनेक गोष्टी शिकवून बळ देण्याचं काम करते. प्रत्येकाला आपल्या चाकाच्या खुर्चीतून जग दाखवण्याचं काम करणाऱ्या, अभिमानाने जगायला लावणाऱ्या या चाकाच्या खुर्चीतून एक नवीन उमेद, चिकाटी,

बळ, प्रेरणा देणारं हे आत्मचरित्र ‘नवसंजीवनी’ देणारा अमृत प्यालाच आहे.

**– अविनाश जाधव**

✦

## निजधाम




मी स्वत: अत्यंत घाबरट आहे. अंधार, एकटं राहणे, भुताच्या गोष्टी याच्यापासून मी लाहनपणापासूनच चार हात लांब राहिले. आजही मित्रमंडळी आणि भावंडांच्या गेट टुगेदरमध्ये ज्या क्षणी हॉरर गप्पा चालू होतात त्या क्षणी मी गाढ झोपून जाते. माझं मलासुद्धा माझ्या विचित्र सवयीचं अनेकदा हसायला येतं; पण शेवटी स्वभावधर्म. या सगळ्या पार्श्वभूमीवर प्रचंड बळ आणि हिंमत एकवटून मतकरींचे पुस्तक वाचायचे एकदा ठरविले आणि ठाण्याच्या पुस्तक प्रदर्शनातून विकतही घेतले! या लेखनाचं, किंबहुना लेखकांचं वैशिष्ट्य म्हणजे, एक प्रकारचं वलय सभोवताली निर्माण होतं आणि आपल्याही नकळत आपण त्या कथानकातलं पात्र होऊन जातो. ती गोष्ट आपलीच आहे किंवा आपल्याच भोवती घडते असं जाणवून देणारा अदृश्य घटक आपल्याच कल्पनाशक्तीतून निर्माण होतो. माणसाचे अंतर्मन फार चमत्कारिक असते. त्याचे गूढ आजतागायत कोणाला उलगडलेले नाही. तिथेच तर भीती, रहस्य या सगळ्याचे मूळ दडलेले असते. या पद्धतीच्या साहित्यात मतकरींनी अनन्यसाधारण कार्य करून ठेवले आहे. ‘निजधाम’ हा त्यांच्या काही विलक्षण गूढकथांचा संग्रह. सगळ्याच कथा थरकाप उडविणाऱ्या आहेत. विशेष नमूद करावीशी वाटते ती ‘जेवणावळ’ कथा! असं लिखाणं सुचणं हे केवळ महान आहे. प्रत्येक कथा वाचताना आपण त्या शब्दांच्या ताब्यात असतो. सभोवतालच्या खऱ्या परिस्थितीचा विसर पडतो आणि या कथानकांची भुरळ पडते. भीती हा शब्द या कथांसाठी अतिशय क्षुल्लक वाटतो. एक महत्त्वाची गोष्ट जी मला आवडली ती म्हणजे, आजच्या काळात भूत-प्रेत, पिशाच इत्यादी गोष्टींवरून अनेक लोकांमध्ये असणारे

समज, गैरसमज, विचार, मते.... ती ज्याने त्याने ठरवावी; पण चांगल्या साहित्याला, साहित्य म्हणूनच पाहावे. मानवी जीवन आणि मन यांच्यात अनेक गोष्टी तर्काच्या पलीकडे आहेत. त्याचा गाभा अजूनही शास्त्रज्ञ पूर्णपणे शोधू शकले नाहीत. या पुस्तकातले एक आवडते वाक्य- 'भीतीच्या विविध स्वरूपांतून मानवी मनाच्या अथांग सागराचा शोध घेणे हेच गूढकथेचे ध्येय असते, मानवी मनाचा शोध हाच साहित्याचा परम उद्देश असतो!'

**– वैष्णवी वैद्य**

✦

## आय डेअर




एक पोलीस अधिकारी म्हणून आपल्या संपूर्ण कारकिर्दीत डॉ. किरण बेदी यांनी प्रवाहाविरुद्ध पोहण्याची आणि कामाची नेहमी नवीन क्षेत्रं स्विकारण्याची हिंमत दाखवली. पोलिसांनी केवळ गुन्हा शोधून काढण्यापेक्षा प्रतिबंधात्मक उपाय आणि सुधारणांना सर्वाधिक महत्त्व द्यावे, या आपल्या मताचा त्यांनी सतत पाठपुरावा केला. सरकारमधील तसेच त्याबाहेरच्याही अनेक मोठमोठ्या प्रस्थांना त्यांनी हादरा दिला. आपल्या कामाला विशाल आणि व्यापक परिमाण देण्याची किरण बेदी यांची वृत्ती सत्तेवरील लोकांनाही दिसून आलेली होती. डॉ. किरण बेदी यांची अभिनव कार्यपद्धती आणि त्यातून निर्माण झालेली वाद-वादळे यांमुळेच सर्व प्रसारमाध्यमांनी त्यांना सतत केंद्रस्थानी ठेवले. हे त्यांना त्यांच्या कामातील पारदर्शकतेचे मूल्यमापन वाटते, तर इतर काही जणांना मात्र तो प्रसिद्धीचा हव्यास वाटतो. सामान्य जनतेला मात्र किरण बेदी 'मसिहा' वाटतात. देशात तसेच परदेशातही अनेकांनी त्यांचा आदर्श समोर ठेवला आहे. तथापि, नाण्याची दुसरी बाजू म्हणून बघता, एखाद्याला असेही वाटू शकेल की त्यांच्याबद्दल प्रसृत झालेल्या त्यांच्या मूळच्याच आत्मप्रेमी प्रवृत्तीत ही आणखी एक भर आहे. किरण बेदी कोणत्याही पदावर काम करीत असोत, कामावर रुजू होण्याच्या पहिल्या दिवसापासून त्यांच्या

कारकिर्दीचा आलेख चढताच असतो. काही काळानंतर त्या अशा काही वादळात सापडतात की त्यांचे ते पदच जाते. त्यांना दिल्लीच्या बाहेर पाठवले गेले, त्यांनी मिझोराम सोडावे म्हणून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली, गोव्यातून फरार म्हणून घोषित करण्यात आले आणि तिहार कारागृहाची सुरक्षितता धोक्यात आणली, असा त्यांच्यावर आरोप देखील करण्यात आला. फक्त किरण बेदी 'आय डेअर!' असं म्हणू शकतात. त्या असं का म्हणू शकतात याचा शोध घेणारे हे पुस्तक.

**– राजेंद्र कवठेकर**

✦

## वंशवृक्ष




एस.एल.भैरप्पा यांच्या लेखनाच्या प्रेमात पडल्यासारखं सध्या मला झालं आहे. 'आवरण' आणि 'धर्मश्री'नंतर 'वंशवृक्ष' ही त्यांची अतिशय गाजलेली कादंबरी जिच्यावर पुढे चित्रपटही निघाला, ज्यात गिरीश कार्नाड यांनी राज ही मध्यवर्ती भूमिका साकारली आहे. तशी ती भूमिका त्यांना व कथानकाला साजेशीच होती. त्यामुळे कादंबरीत जेव्हा जेव्हा राजचा उल्लेख येतो तेव्हा समोर गिरीश कार्नाडच दिसतात. कादंबरीचा मध्यवर्ती विषय आहे वंश आणि त्या वंशवृद्धीसाठी आसुसलेली दोन कुटुंबं आणि दोन वंशाचे दिवे ज्यात एक जण वडिलांच्या तर एक जण आईच्या प्रेमाला मुकलेला आहे. कथा सुरू होते सदाशिवराव आणि श्रीनिवास श्रोत्रींच्या कथानकापासून. श्रीनिवास श्रोत्रींचा तरुण मुलगा नदीत वाहून गेलेला आहे, ज्यामुळे घरात एक तरुण पत्नी, एका लहान मुलाची आई विधवा झालेली आहे. संस्कृतचे पंडित असणाऱ्या श्रीनिवास यांच्याकडे म्हैसूरचे प्रसिद्ध इतिहासाचे अध्यापक सदाशिवराव आलेले असतात, ज्यांना भारताचा बृहत इतिहास पाच खंडांत लिहायचा आहे. त्यातला एक खंड लिहून झालेला असतो, जो दाखवायला आणि मार्गदर्शन घ्यायला ते श्रीनिवास शास्त्रींकडे आलेले असतात. सतत संशोधनात

असल्यामुळे सदाशिवरावांचे आपली बायको नागलक्ष्मी हिच्याकडे कायम दुर्लक्ष असते. तर लहान भाऊ राज नुकताच लंडनवरून म्हैसूरला घरी आलेला असतो. राज प्राध्यापक म्हणून कॉलेजमध्ये त्याच्या नाटक मंडळामुळे प्रसिद्ध असतो. पुढे या सगळ्यांच्या आयुष्यात एक वादळ येतं. श्रीनिवास शास्त्रींची विधवा सून कॉलेज शिकायला म्हैसूरला येते आणि राज आणि तिचं एकमेकांवर प्रेम बसतं. इकडे सदाशिवराव श्रीलंकन संशोधिका करुणा रत्ने हिच्यामुळे प्रभावित होऊन तिच्याशी दुसरं लग्न करतात. या नंतर असणारी कथा ही खरंच वाचायलाच हवी. या कादंबरीचा शेवट ज्या प्रकारे भैरप्पांनी केलाय त्याला तोड नाही. वंशवृक्ष वाढवण्यासाठी झालेली फसवणूक, काहींची तगमग याचं दुःख हे सर्वांनाच गुरफटून टाकतं, ज्यात कात्यायनी, करुणा रत्ने यांची झालेली परवड, तर टाकलेली बायको म्हणून नागलक्ष्मीची झालेली कुचंबणा, सनातन विचारांचे श्रीनिवास, बायकोच्या सुखासाठी आसुसलेला आणि सगळ्यांची काळजी घेणारा राज, संशोधनात गुरफटलेले सदाशिवराव ही पात्रे रंगवताना सर्वांचे भावतरंग, विचार, समांतर चाललेली कथानके म्हणजे चित्रपटाची उत्कृष्ट पटकथा आपण वाचतोय असंच वाटत राहतं.

**– प्रणव पाटील**

✦

## हिज डे





हिज डे. आजचा पुस्तकाचा विषय वेगळा आहे. कदाचित या विषयाला, या जगण्याला, त्यांच्या असण्याला काडीचीही किंमत देत नसेल समाज; पण ते आहेत, स्त्री, पुरुष या जातीत मोडत नसले तरी माणूस आहेत... त्यांना हक्क आहे जगण्याचा, मानसम्मान मिळवण्याचा... आजचा अभिप्राय 'हिज डे' या पुस्तकासाठी...स्वाती चांदोरकर या लेखिकेने तृतीयपंथी लोकांची व्यथा आपल्यासमोर या पुस्तकातून मांडली आहे....फार पूर्वी शहेनशाह, तृतीयपंथी लोकांना त्यांच्या

प्रामाणिकपणामुळे जनानखान्यात सुरक्षारक्षक म्हणून ठेवत असत... पण पुढे त्यांचा प्रामाणिकपणा इंग्रजांसाठी धोकादायक ठरू शकतो, या हेतूने त्यांना विनाकारण बंदी बनवण्यात आले आणि त्यांचा अतोनात छळ करण्यात आला; पण एक दिवस एका जेलरला या सगळ्या प्रकरणात या लोकांची काहीही चूक नाही हे लक्षात येते अन् दया दाखवून त्यांना तो एक दिवस मुक्त जगण्यासाठी सोडतो आणि म्हणतो 'वन डे इज ओन्ली हिज डे'आणि त्या दिवशी पासून यांना 'हिजडे' म्हटले गेले. हा शब्द त्यांच्यासाठी मुक्तीचा दिवस म्हणून मानाचा आहे असं ते मानतात...कथेची सुरवात होते ती हेलीना नावाच्या वीसवर्षीय लाजऱ्याबुजऱ्या अन् शारीरिक वाढ पूर्ण न झाल्यामुळे खचलेल्या, जगापासून अलिप्त राहणाऱ्या मुलीपासून.. मानसोपचार तज्ज्ञ म्हणून शिक्षण घेत असताना तिची मैत्री होते ती चमेलीसोबत जी एका तृतीयपंथी 'हाला'ची मुलगी असते. तिला लोकांनी जवळपास वाळीत टाकल्यासारखेच असते. दुसरी मैत्रीण जया तिला मुलींबद्दलच आकर्षण का वाटत असते याची नुकतीच जाणीव झालेली.. चमेली अन् जयासोबत मैत्री झाल्यानंतर तिचे आयुष्य पूर्णतः बदलून जाते.. चमेलीसोबत राहिल्यावर तृतीयपंथी लोकांना साधे पोट भरण्यासाठी किती कठीण आयुष्य जगावे लागते याची तिला प्रचिती येते.. या वस्तीतील, श्यामची श्यामली होताना, आणि 'सुक्की'चा 'तो' होताना जी शरीराची, मनाची वेदनादायी चिरफाड होते ते वाचून तर अंगावर काटा उभा राहतो... शरीर अन् मन दोन्ही भिन्न असणारे हे लोक निसर्गाची ही देणगी नाकारतात तेव्हा प्रामाणिकपणे देवाची माफीही मागतात.. प्रामाणिकपणा यांच्यात जन्मत: असतो.. पैशासाठीची, खरं तर जगण्यासाठीची धडपड, त्यामुळे करावी लागणारी देहविक्री आणि अस्वछता, त्यातून होणारे जीव घेणारे भयंकर आजार, स्वतःच्या लोकांनी नाकारलेले, समाजाने नाकारलेले... अशा स्थितीत हे लोक एकमेकांचा आधार बनतात... अतिशय हृदयद्रावक व्यथा या पुस्तकातून समोर आणणाऱ्या धाडसी लेखिकेला सलाम! त्यांच्या छोट्या छोट्या गोष्टींचा तपशील अगदी बेडरपणे पुस्तकात मांडला आहे.. हेलीना, चमेली, जयाचा आणि तृतीयपंथी लोकांचा जीवनप्रवास कसा होतो, हे जाणून घेण्यासाठी हे पुस्तक नक्की वाचा.

**– मनीषा संदीप**

पुस्तक परिचय




# हल्दीराम

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**पवित्रा कुमार**

अनुवाद

**नीला चांदोरकर**

**नमकीन पदार्थांच्या अस्सल चवीची खवैयांना ओळख करून देणाऱ्या आणि एका छोट्या शहरातून जगव्यापी भुजिया साम्राज्य उभं करणाऱ्या हल्दिरामांची रंगतदार चरितगाथा**

हल्दिराम ही एका अशा कुटुंबाच्या व्यवसायाची कहाणी आहे, जिची सुरुवात राजस्थानातील बिकानेर नावाच्या लहानशा गावात होते अन् जी आपल्याला तिच्या जगभरात पसरलेल्या अवाढव्य उपाहारखाद्य साम्राज्याची ओळख करून देते.

हल्दिराम हे नाव सर्व भारतीयांना सुपरिचित आहे. ते बनवत असलेल्या शेवगाठी इत्यादी खाद्यपदार्थांना आपण फरसाण या नावानं ओळखतो. जे नाव आपल्या सर्वांच्या जिभेवर घोळत असतं, त्याच नावाच्या एका धुरंधर व्यक्तीनं या उद्योगव्यवसायाचा पाया रचला, तेव्हा तो एक निव्वळ कौटुंबिक व्यवसाय होता. चविष्ट, खुसखुशीत, खमंग, चटकदार अशी विशेषणं लावता येतील अशी शेव त्यांनी बनवायला सुरुवात केली ती बिकानेरमधील सुप्रसिद्ध भुजिया बाजारात. ब्रिटिश अमदानीत बिकानेर हे एक लहानसं संस्थान होतं. रेल्वेचं जाळं भारतात पसरू लागल्यानंतर बिकानेरला जंक्शन हा दर्जा प्राप्त झाला. व्यापारउदीम करणारे मारवाडी या गावात बहुसंख्येनं राहत होते. हल्दिरामांसारखे कित्येक व्यापारी शेवगाठींसारखे पदार्थ भुजिया बाजारात विकत असत; पण हल्दिरामांच्या शेवेनं खवय्यांच्या जिभेवर अक्षरशः गारूड केलं. बिकानेर संस्थानाचे अधिपती असलेल्या डुंगरसिंगांचं नाव देऊन हल्दिरामांनी आपल्या शेवेला इतरांच्या शेवेहून एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवलं. पदार्थाच्या नावाची करामत काय असते, हे त्यांनी जणू सिद्ध केलं.

दिसामासांनी त्यांचा व्यवसाय वाढत होता. योगायोगानं त्यांना आपल्या व्यवसायाला कोलकात्यासारख्या मोठ्या शहरात नेण्याची संधी मिळाली अन् त्यांनी त्या संधीचं अक्षरश: सोनं केलं. रामेश्वर नावाचा आपला सर्वांत धाकटा मुलगा आणि शिवकिशन नावाच्या नातवाला घेऊन ते राजस्थानातून

शेकडो मैलांवरील कोलकात्यात गेले, अन् ‘साहसे श्रीः प्रतिवसति’ या उक्तीचा त्यांना प्रत्यय आला. कोलकात्यात मारवाडी लोक– प्रामुख्यानं व्यापारीच– बहुसंख्येनं होतेच. त्या सर्वांच्या रसनेला हल्दिरामांच्या शेवेनं आकृष्ट केलं. हल्दिरामांचे चटकदार पदार्थ कोलकात्यातील मारवाड्यांच्या रोजच्या थाळीत विराजमान झाले अन् थोड्याच कालावधीत हल्दिराम म्हणजे भुजिया, शेव हे नाव सर्वतोमुखी झालं.

एका वेगळ्या कारणामुळे– कौटुंबिक कलहामुळे– हल्दिरामांच्या थोरल्या चिरंजीवांचे पुत्र, शिवकिशन कोलकात्यातील व्यवसायातून बाहेर पडले आणि त्यांनी नागपुरात आपलं बस्तान बसवलं. त्यांनीच शेवगाठी इत्यादी तिखटमिठाच्या पदार्थांबरोबर मिष्टान्नांची निर्मिती करण्याचं धाडस केलं अन् बघताबघता त्यांची काजूकतली प्रचंड लोकप्रिय झाली. नागपुरातच त्यांनी उपाहारगृह उघडण्याचा उपक्रम सुरू केला आणि त्या क्षेत्रातही त्यांना प्रचंड यश मिळालं.

नागपुरातील यशानं शिवकिशन यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला. आपला पाठचा भाऊ मनोहरलालच्या मदतीनं त्यांनी राजधानी दिल्लीत पाऊल रोवलं, अन् तिथेही त्यांना अभूतपूर्व यश मिळालं. मनोहरलालांच्या महत्त्वाकांक्षेला धुमारे फुटत गेले. त्यांनी देशभरात नेमलेल्या वितरकांमुळे देशाच्या कानाकोपऱ्यात त्यांचे खाद्यपदार्थ जाऊन पोहोचले. त्यांनीच आपल्या उत्पादनांना प्लॅस्टिकच्या आकर्षक वेष्टणात बांधून विकण्याचा धाडसी उपक्रम सुरू केला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं पदार्थांचा टिकाऊपणाही वाढवला. अर्थात, या मार्गावरची त्यांची वाटचाल तितकी सुलभ नव्हती; कारण परंपरांना चिकटून राहण्याच्या त्यांच्या आजोबांमुळे आणि अल्पसंतुष्ट स्वभावाच्या वडिलांमुळे त्यांना प्रचंड विरोध सहन करावा लागला. तरीही त्यांनी चिकाटीनं प्रयत्न सुरू ठेवले आणि हल्दिरामची उत्पादनं देशाबाहेर विकण्यातही त्यांना यश आलं.


आता हल्दिरामच्या अगरवाल कुटुंबातली तिसरी पिढी व्यवसायात उतरली आहे. नवेनवे मार्ग चोखाळत त्यांची घोडदौड चालूच आहे. अनेक पातळ्यांवर ते यशाची शिखरं पादाक्रांत करत आहेत. याचा अर्थ असा नाही की सर्वच बाबतीत त्यांना यश मिळत आहे. अगरवाल कुटुंबानं अनेक

पराजयही पत्करले आहेत, तशीच अनेक आव्हानं स्वीकारली आहेत. पहिलं आव्हान– कुटुंबातील व्यक्तींमधील भांडणं, हेवेदावे– अगदी हल्दिरामच्या वेळीच त्यांच्यासमोर ठाकलं. या कटकटींवर उपाय म्हणून स्वतः हल्दिराम आपल्या मुलं-सुना-नातवंडांसह घराबाहेर पडले, अन् अक्षरशः रस्त्यावर आले; पण डोक्यावर ना छप्पर, ना उदरनिर्वाहाचं काही साधन, अशा निष्कांचन अवस्थेतूनही ते बाहेर पडू शकले. पुन्हा आपल्या पायांवर उभे राहिले. कौटुंबिक कलहाचं ग्रहण त्यांच्या कुटुंबानं पुढे अनेक वेळा अनुभवलं. त्याच्याच जोडीला ब्रँडवरून सुरू झालेले न्यायालयीन खटले वर्षानुवर्षं त्यांच्या मुला-नातवंडांनी अनुभवले आहेत. अतिमहत्त्वाकांक्षेपायी त्यांच्या एका नातवानं, रामेश्वरलालांच्या थोरल्या मुलानं, प्रभुशंकरांनी, तुरुंगाची हवा चाखली. त्यांच्या कुटुंबाविषयी वृत्तपत्रांतून लिहून आलं. भरपूर बदनामी झाली. मनोहरलालनी १९८३मध्ये दिल्लीतील चांदनी चौकात सुरू केलेलं दुकान व त्याच्या वर बांधलेला कारखाना १९८४ सालच्या शिखांविरोधीच्या दंगलीत जळून खाक झाला. तरीही डगमगून न जाता मनोहरलालनी पुन्हा एकदा सगळा डोलारा उभारला. राखेतून जन्म घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे त्यांनी नव्यानं व्यवसायाचा पाया रचला. थोडक्यात सांगायचं तर आव्हानांना समर्थपणे सामोरं जायचं, त्यांना परतवून लावत दमदारपणे मार्गक्रमण करत राहायचं, हा हल्दिरामचा स्वभावविशेष त्यांच्या मुलांमध्ये आणि नातवांमध्येही उतरला असल्यामुळे त्यांचे सर्व ठिकाणचे– बिकानेर, कोलकाता, नागपूर आणि दिल्ली येथील व्यवसाय मोठ्या दमदारपणे चालू आहेत.

अशी ही कहाणी वाचकांना खिळवून ठेवते. तिच्या प्रगतीचा वारू त्यांना कधी आश्चर्यचकित करतो, तर कधी त्यांच्या समोर ठाकलेल्या आव्हानांमुळे, संकटांमुळे त्यांची मती गुंग होते; पण एका भारतीय उपाहार खाद्य पदार्थांच्या व्यवसायाच्या प्रगतीची ही कहाणी त्या पदार्थांइतकीच चटकदार आहे, यात शंका नाही.

✦

पु
स्त
क
प
रि
च
य




# चर्चिलच्या पाऊलखुणा

**(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**

**रिचर्ड होम्स**

अनुवाद

**अवधूत डोंगरे**

**विन्स्टन चर्चिल यांच्या वादळी व्यक्तिमत्त्वाचा मार्मिक लेखाजोखा...**

ब्रिटनमधील सर्वांत थोर नेत्यांपैकी एक असलेल्या विन्स्टन चर्चिल यांचं हे नवीन मार्मिक चरित्र व्यक्तिमतत्त्वाचा अभ्यास करतंच, त्यासोबत एका असामान्य कारकिर्दीची कहाणीसुद्धा सांगतं. दुसऱ्या महायुद्धाच्या संकटकाळामध्ये चर्चिल यांनी ब्रिटनच्या पंतप्रधानाची भूमिका कशी निभावली याबद्दल बरंच काही लिहिलं गेलं आहे; पण एक माणूस म्हणून विन्स्टन यांची जडणघडण कशी झाली, त्यांच्यावर कोणते प्रभाव पडले-त्यांचं क्षुब्ध बालपण, राजकीय नेते असलेले भपकेबाज वडील रँडॉल्फ आणि आकर्षकपणासाठी ख्यातकीर्त असलेली त्यांची अमेरिकी आई जेनी हे सर्व संदर्भ तपासण्यासाठी नवीन सामग्रीचा यथायोग्य वापर होम्स यांनी केला आहे.

चर्चिल ज्या गुणवैशिष्ट्यांमुळे थोर ठरतात, त्याच वैशिष्ट्यांमुळे त्यांनी प्रचंड मोठ्या घोडचुका केल्या. बोअर युद्धाच्या वेळी तरुण वार्ताहर असताना चर्चिल यांची बेपर्वा वृत्ती त्यांना नायकत्व देऊन गेली; बहुधा त्याच वृत्तीमुळे १९१५मध्ये गलीपोली मोहिमेदरम्यान मित्र राष्ट्रांच्या फौजांमधील हजारो जवानांना प्राण गमवावे लागले आणि १९४२मध्ये सिंगापूरचा पाडाव झाला, त्यामध्येही या वृत्तीचा हातभार लागला असावा.

'चर्चिलच्या पाऊलखुणा' या पुस्तकामध्ये हॅरो स्कूल, वायव्य आघाडी, सुदान, दक्षिण आफ्रिका, १० डाउनिंग स्ट्रीट आणि चर्चिल यांचा महत्प्रिय चार्टवेल परिसर असा उत्कंठावर्धक प्रवास वाचकाला घडतो. ब्लेनहेम पॅलेस इथे खानदानी वैभवामध्ये हा प्रवास सुरू होतो आणि एका गावातील चर्चच्या शांत आवारात त्याचा शेवट होतो. खरंतर हे सगळं ऑक्सफर्डशायरच्या थोड्या एकरांमधलेच परिसर आहेत; पण त्यात घडणारा हा जीवनप्रवास मात्र असामान्य विस्तार दाखवणारा आहे.


दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटनचं यशस्वी नेतृत्व केलेले विन्स्टन चर्चिल जगप्रसिद्ध नेते म्हणून ख्यातकीर्त आहेत. जागतिक इतिहासामध्ये त्यांच्या युद्धनेतृत्वावर पानं खर्ची पडत आलेली आहेत; पण त्यांच्या जीवनाच्या जडणघडणीमध्ये यशाइतकाच अपयशाचाही वाटा आहे. प्रत्यक्ष

सैनिकाचा गणवेश परिधान करण्यापासून ते राष्ट्राच्या पंतप्रधानपदाची धुरा सांभाळण्यापर्यंत अनेक कामगिऱ्या त्यांनी केल्या. त्यात कधी त्यांची प्रशंसा झाली, कधी त्यांच्यावर टीका झाली. कधी त्यांच्या कामगिरीची नोंद सुवर्णाक्षरांनी केली गेली, तर कधी त्यांची कामगिरी विपरीत अर्थाने इतिहास घडवणारी ठरली.

अशा या वादळी व्यक्तिमत्त्वाचा आलेख रिचर्ड होम्स यांनी या पुस्तकामध्ये मांडला आहे. हा आलेख केवळ चर्चिल यांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाचा नाही किंवा केवळ त्यांच्या वैयक्तिक जीवनाचाही नाही. उलट राजकीय व्यक्तिमत्त्व आणि वैयक्तिक जीवन या अपरिहार्यपणे एकमेकांमध्ये मिसळलेल्या वाटांचा मागोवा या पुस्तकात घेतलेला आहे. विन्स्टन यांचा स्वभाव कसा होता? तो जसा होता तसा का घडला असावा? त्या स्वभावाचे पडसाद त्यांच्या सार्वजनिक जीवनावर आणि पर्यायाने ब्रिटनच्या आणि उर्वरित जगाच्याही पटलावर कसे उमटले? याचा मार्मिक लेखाजोखा होम्स यांनी मांडला आहे.

इतिहासलेखनात सनावळी अपरिहार्य असल्या, तरी त्या सनांमध्ये जगलेली माणसं, त्यांचे अनुभव, त्यांच्या जाणिवा हा इतिहासलेखनाचा मुख्य आशय असतो. होम्स यांचं पुस्तक या अर्थानेही आशयसंपन्न आहे. विन्स्टन चर्चिल यांचे रक्ताचे नातेवाईक, त्यांच्या आयुष्यात आलेली इतर व्यक्तिमत्त्वं, त्यांचा विन्स्टन यांच्यावर पडलेला प्रभाव यांचीही दखल होम्स यांनी उत्तमरीत्या घेतली आहे. थोडक्यात, विन्स्टन यांच्या राजकीय वाटचालीचा मागोवा घेताना, त्यातील वैयक्तिक अंतःप्रवाहसुद्धा नोंदवण्याचं काम होम्स यांनी या पुस्तकाद्वारे केलं आहे.


✦





**तसलिमा नासरिन लिखित**
**दोन नवीन पुस्तके**

मूलतत्त्ववादाच्या जहरी मूल्याविरोधात
सडेतोड आवाज उठविणाऱ्या, मानवतावादी विचारवंत
तसलिमा नासरिन यांचे निर्भय, प्रकट मुक्तचिंतन




## भावनागुलो

**अनु. अपर्णा झा**





## शोकोल ग्रिह हारालोजार

**अनु. मंजिरी धामणकर**

**किंमत प्रत्येकी : २९५/-रु. । पोस्टेज अतिरिक्त**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तक परिचय




# समर्पण

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**मंजुश्री गोखले**

**संत कान्होपात्राचं भावविश्व चित्रित करणारी, भक्तीरसानं ओथंबलेली मंजुश्री गोखले यांची कादंबरी**


माया कलावंतिणीची मुलगी श्यामा आणि तिची मुलगी कान्होपात्रा. तिच्यावेळेस श्यामाला डोहाळे लागतात तेच मुळी विठ्ठलभक्तीचे. नामस्मरण करावं, संतांच्या सहवासात रमावं, तुळशामाला धारण कराव्यात, मूर्ती पाहत राहावी अशा नाना तऱ्हांनी येणारा गर्भ आपल्या सात्त्विक प्रवृत्तीची चुणूक देतो खरा; पण ते कोणाच्या लक्षात येत नाही.

कान्होपात्रा जन्माला आल्यापासून देवाच्या, विशेषतः पांडुरंगाच्या प्रेमात पडते. पुढे वयात येताच ती त्याला पती मानू लागते. त्याच्या स्तुतीसाठी अभंग रचू लागते. मग एकदा ती कशीतरी पंढरपूरला पोचते. तिथे विठ्ठलाच्या गळ्यातली तुळशीची माळ तिच्या गळ्यात पडते. भक्तीत तल्लीन होऊन ती परत येते; पण तिची एकंदरीत लक्षणं पाहता, तिची आजी आणि आई, जोडीला तिचा सावकार बाप तिला सुलतानाच्या जनानखान्यात पाठवायचं ठरवतात. तिच्यासमोर काहीही पर्याय उरत नाही. ती निघते. रस्त्यात ती शिपायांना पटवते की जाण्याआधी पंढरपूरच्या विठ्ठलाचं दर्शन घेण्याचा त्यांच्या घराण्याचा रिवाज आहे. हे ऐकल्यावर ते शिपाई तिला पंढरपूरला घेऊन येतात. तिथे मंदिरात येताच ती पुढे होते. ते मुस्लीम सैनिक बाहेर थांबतात. अतिशय काकुळतीला येत ती विठ्ठलाची प्रार्थना करते. अभंग गाताना त्याच्या पायावर डोकं ठेवून प्राण सोडते.

कादंबरी मनात रेंगाळत राहते.

✦

पुस्तक परिचय




# सुरम्य सूर्यास्त

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**दिनकर जोषी**

अनुवाद

**प्रतिभा काटीकर**

**उतरत्या वयातही आत्मसन्मानाचं बी पेरणारा मूलमंत्र...**


मावळतीच्या सूर्योदयासारखं म्हातारपण...मानलं तर निवांतपण, मानलं तर मानसिक खळबळ...या उतारवयाचा स्वीकार करणं आणि ते आनंददायी करणं इतकंही अवघड नाही; पण त्यासाठी हवा असतो, थरथरत्या हातांना आधार देणारा एक सच्चा मार्गदर्शक. हे पुस्तक असंच मावळतीचा सूर्यास्त सुरम्य करणारा मार्गदर्शक आहे. दिनकर जोषी या पुस्तकात म्हातारपणातील शारीरिक, मानसिक, आर्थिक अशा अनेक प्रश्नांचा सांगोपांग आढावा घेतात. आणि म्हातारपणाचा विचार केवळ म्हातारपणीच करायचा नसतो, याची खोल जाणीवही पेरतात.

वाढणारं आयुर्मान आणि घटणारा जन्मदर या दोन कारणांनी वैश्विक पातळीवर ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत वाढ होत आहे. ज्येष्ठांच्या, विशेषत: आपल्या देशातील ज्येष्ठांच्याही स्वत:च्या अशा वेगळ्या समस्या असतात, सामाजिक प्रश्न असतात, मानसिक ताणतणाव असतात, हे आपल्याकडे अजून मान्य झालेले नाही. गुजरातसह कोणत्याही भाषेमधील एकाही वृत्तपत्राने आपल्या वाचनसामग्रीत ज्येष्ठांसाठी खास असा विभाग केलेला नाही. देशातील अन्य भाषांतही बहुतांशी हीच परिस्थिती आहे. कुठेतरी कानाकोपऱ्यात एखादं लहानसं नगण्य, दुपानी, चौपानी पत्रक छापलं जात असण्याची शक्यता आहे. यासाठीच ज्येष्ठ लेखक दिनकर जोषी यांनी पुढाकार घेत या विषयावर हे सांगोपांग पुस्तक साकारले आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या आणि त्यांची मनोभूमिका नजरेसमोर ठेवून यातील लेख लिहिले गेले आहेत. यात ते फक्त ज्येष्ठांच्या प्रश्नांची मांडणी करत नाहीत, तर त्यावर योग्य मार्गदर्शनही करतात. स्वतःचं वार्धक्य कसं स्वीकारावं, याची यथासांग मांडणी ते करतातच; पण आपल्या पालकांचं वार्धक्य मुलांनी कसं हाताळावं, याचं अनमोल मार्गदर्शनही यात आहे. ज्येष्ठांची वाणी व व्यवहार, आपल्या असण्याची अडचण न व्हावी, उतारवयातली पोकळी, अंतर्मुखतेचे आनंदवन अशा लेखांमधून ज्येष्ठत्वाबद्दलचं भान अधिक गहिरं होत जातं.

✦

पुस्तक परिचय




# हरित युद्धे

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**बहार दत्त**

अनुवाद

**रवींद्र भगवते**

**धरणांनी गिळलेली अरण्यं..खाणींनी गिळलेले डोंगर... औद्योगिक प्रकल्पांनी गिळलेले जलस्रोत... माणसानं स्वतःच्या जीवन स्रोतांविरोधातच पुकारलेल्या युद्धांचं अस्वस्थ करणारं चित्रण... पर्यावरण कार्यकर्त्या बहार दत्त यांनी मांडलेली वास्तवदर्शी हकिगत...**

पर्यावरणाशी संबंधित जीवशास्त्रज्ञ आणि पत्रकार असलेल्या श्रीमती बहार दत्त यांनी दिलेल्या अनेक हरित लढ्यांविषयीचे ग्रीन वॉर्स (हरित युद्धे ) हे एक चित्तथरारक आणि माहितीपूर्ण असे पुस्तक आहे. दहापेक्षाही अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवलेल्या श्रीमती बहार दत्त यांनी कुठेही रुक्ष होऊ न देता आपले अनुभव या पुस्तकात कथन केले आहेत. प्राण्यांसाठी रुग्णवाहिका चालवणे, आफ्रिकेतील कोलोबस माकडांसाठी दोरखंडाचे पूल बांधणे, आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी असलेल्या ब्रिटनमधील जर्सी प्राणिसंग्रहालयातील अमेझॉन माकडांचा अभ्यास करणे, गारुड्यांच्या जमातीशी जवळजवळ दशकभर संपर्क साधून वेळप्रसंगी त्यांच्या घरी राहून सर्प संरक्षणाबरोबर त्यांना पर्यायी रोजगार मिळवून देणे अशा अनेक गोष्टी करून श्रीमती बहार दत्त यांनी पर्यावरणीय पत्रकारितेला आज मानाचे स्थान मिळवून दिले आहे.

'ग्रीन वॉर्स' ही खरोखरच पर्यावरण रक्षणासाठी श्रीमती दत्त यांनी लेखणी आणि कॅमेरा घेऊन केलेली युद्धे आहेत. 'युद्धस्य कथा रम्या' या सुभाषिताप्रमाणे हे वृतान्त रंजक आहेत; पण यामध्ये लेखिकेने पत्करलेले धोके पाहून त्यांच्या धडाडीला दाद द्यावी वाटते. विकास की पर्यावरण संरक्षण असा वाद नेहमीच घातला जातो; पण पर्यावरणविषयक कायदे पाळून विकास साधता येतो, हा विश्वास लेखिकेने दिला आहे.

पहिले प्रकरण गारुडी आणि बवारिया या शिकारी जमातीविषयी आहे. दिल्लीपासून केवळ दहा किलोमीटरवर असलेल्या बदरपूर येथील २०० कुटुंबांच्या गारुड्यांच्या वस्तीत लेखिकेने दशकभर काम केले आहे. कित्येक वेळा ती शिशनाथ आणि बनवारी नाथ या गारुड्यांच्या घरीही राहिली आहे. रोजगार कमावण्यासाठी सापांचे शोषण करणे, नैसर्गिक जीवनापासून त्यांना वंचित करणे हा कायद्याने गुन्हा आहे, हे गारुड्यांना तिने पटवले आणि त्यांनी पर्यायी रोजगार मिळवावा म्हणून अथक प्रयत्न केले. सुरवातीला

गारुड्यांकडून नाकारलं गेलं तरी प्रयत्न न सोडता लेखिकेने गारुड्यांना कर्ज मिळवून दिली. फळांच्या व्यवसायाला प्रवृत्त केलं. त्यांच्याकडची बीन (पुंगी) वाजवण्याची कला ओळखून त्यांच्या वादक पार्ट्या तयार केल्या. १०० गारुड्यांचा वाद्यवृंद स्थापित करून  दिल्ली, हैदराबाद, मुंबई नव्हे, तर इटलीमध्येही कार्यक्रम घडवून आणले. सर्पसंरक्षण आणि गारुड्यांचे पुनर्वसन दोन्ही यशस्वी केले.

बवारिया ही राजस्थानमधील मुक्त आणि भटकी अशी शिकारी जमात आहे. सारिस्का राष्ट्रीय उद्यानातील वाघांच्या शिकारीचा आरोप या जमातीवर केला जात असे. आरोपात काही अंशी तथ्य असले  तरी ही जमात अशी का वागते याचा अभ्यास करून त्यांना पर्यायी उद्योग देणे आवश्यक आहे. यासाठी लेखिकेने स्वतः त्या जंगलात भटकून जमातीचा अभ्यास केला. जमातीची मुखिया असलेल्या 'ढोली' या स्त्रीबरोबर चक्क झाडाखाली राहून ती बवारिया जमातीत मिसळली. ती जमात 'हरित गुन्हेगार' (green criminal ) म्हणून ओळखली जायची. त्या जमातीचे जनावरांचा मागोवा घेण्याचे कसब जाणून त्यांना हरित रक्षक (green guards ) बनवणे, चौकीदारीचा रोजगार देणे हे तिने साधले.

उत्तर प्रदेशातील एटावा इथे विमानतळ बांधण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री मुलायमसिंग यादव यांनी प्रस्तावित जागेत सारस पक्षीच नाहीत आणि सगळी पडीक जमीन आहे, असे खोटे निवेदन दिले. सारस पक्षी ही नामशेष होण्याच्या मार्गावर असलेली संरक्षित जात आहे. निवेदनाचा खोटेपणा लेखिकेने खोडून काढला. आणि धमक्यांची पर्वा न करता मुख्यमंत्र्यांशी प्रतिवाद केला. त्याविरोधात रान उठवले. शेवटी तो प्रकल्प मुख्यमंत्र्यांना सोडून द्यावा लागला.

चंबळ नदीच्या पाण्यातल्या शंभरएक सुसरी पटापट मरू लागल्या. औद्योगिक संस्थानी सोडलेल्या दूषित द्रव्यातील टॉक्सिक पदार्थ पोटात जाऊन सुसरींच्या किडन्या खराब झाल्या, हे मरण्याचे कारण होते. वास्तविक, या सुसरींची जात ही निसर्गसंरक्षण करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटनेने 'संरक्षित जात' म्हणून जाहीर केली आहे; पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. याशिवाय बाहेर येऊन वाळूवर अंडी घालणाऱ्या सुसरींची वाळूच वाळू माफिया काढून नेत आहेत. लेखिकेने कायदा कसा जुमानला

जात नाही आणि नदीवर अवलंबून असलेल्या कोळ्यांना पर्यायी व्यवसाय किंवा पर्यायी नदी प्रवाह उपलब्ध करून द्यायला हवेत हे सुसंगतपणे मांडले आहे.

मेघालयातून बांगलादेशमध्ये कोळसा आणि चुनखडीची बेकायदा निर्यात होत आहे. सिमेंटनिर्मितीसाठी जंगले भरपूर असूनही ती नाहीतच असे सांगून सिमेंट कंपनी काम करते आहे. दहशतीचे वातावरण पोलिसांच्या साथीने निर्माण केले जात आहे, हे चेरापुंजीला भेट देऊन लेखिकेने मांडले आहे.

अरुणाचल प्रदेशातील दिबांग व्हॅली येथे आशियातल्या सगळ्यात उंच धरणाचा प्रकल्प तेथील इडू मिश्मी या स्थानिक जमातीला विस्थापित करून करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक परवानेही घेतले जात नाहीत. नागरिक सभा (Public Hearing) चे फार्स केले जातात. लेखिकेने आपली टीम तेथे नेऊन अनेक मुलाखती घेऊन वस्तुस्थितीचे वर्णन केले आहे. प्रकल्पाचे भूमिपूजन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी त्या ठिकाणी प्रत्यक्ष न जाता अरुणाचलची राजधानी इटानगर इथे केले, ते विरोधाला घाबरूनच तर नाही, असा सवाल लेखिकेने केला आहे.

पर्यावरण मंत्रालयाची परवानगीही न घेता हरयाणाचे मुख्यमंत्री भूपिंदरसिंग हुडा यांनी सिंचनप्रकल्प राबवताना सरस्वती वन्यप्राणी अभयारण्याच्या दोनशे रानडुकरांच्या जीवाचा विचार केला नाही. यासंदर्भात संजीव चतुर्वेदी नामक जंगल अधिकाऱ्याने दिलेल्या एकाकी लढतीचे समर्थन लेखिकेने केले आहे. सध्या या प्रकल्पावर सुप्रीम कोर्टाने स्थगिती आणली आहे.

ओरिसामधील कलाहांडी येथे वेदांत अल्युमिनियम लिमिटेड या ब्रिटनस्थित महाकंपनीचे बेकायदा खाणकाम चालू आहे. स्थानिक रहिवाशांच्या विरोधाला जुमानले जात नाही. काडो माझी या कार्यकर्त्याची हत्या करून पोलिसांचे आणि राजकीय संरक्षण मिळवून दहशतीचे वातावरण निर्माण केले जात आहे. हे सारे लेखिकेने भीडभाड न ठेवता नमूद केले आहे.

गोव्यामधील लोखंडाच्या खाणी कशा बेकायदा आहेत. इथेही राजकीय संरक्षण घेऊन दहशत निर्माण केली जात आहे. प्रचंड प्रमाणावर असलेल्या प्रदूषणामुळे रहिवाशांना फुप्फुसाच्या आजारांना तोंड द्यावे लागत आहे.

आणि एवढे असूनही राज्याच्या महसुलात विशेष वाढ होत नाही. सुप्रीम कोर्टाचे आदेश झुगारून खाणी चालवल्या जात आहेत. सुपीक जमीन जाळून सपाट करून खाणीसाठी उपलब्ध केली जात आहे, हे सगळे वाचून वाचक सुन्न होऊन जातो.

आपण जे खोबरेल तेल वापरतो ते मिळवण्यासाठी इंडोनेशियातील सुमात्रा येथे ओरँग उटान या वानर जातीचे बेकायदा उच्चाटन होत आहे, याची आपल्याला कल्पनाही नसते. भारतात इंडोनेशियातून खोबरेल तेलाची आयात केली जाते. लेखिकेने स्वतः इंडोनेशियाला कशी भेट दिली. तेथेही कशा प्रकारची दहशत आहे याचा रोचक वृतान्त आपल्याला 'द ओरँग उटान लास्ट स्टॅन्ड' या प्रकरणात वाचायला मिळतो.

आज गंगा नदीवर सिंचनाचे ३०० प्रकल्प राबवले जात आहेत, ते राबवताना पर्यावरण संरक्षणाचा विचार केला जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. हिमनग वितळत आहेत. बर्फाचे प्रमाण पृथ्वीतलावरून कमी कमी होत आहे. लेखिकेने गंगोत्रीपासून सुरुवात करून बराचसा प्रदेश पिंजून काढला. तिच्या लक्षात आले की अभयारण्याचा विचारच केला जात नाही. उत्तराखंडात निसर्गाचा जो महाकोप झाला आहे त्याचे कारण अतिवृष्टी आणि ढगफुटी हे होतेच; पण धरणाच्या झडपा वीजनिर्मितीसाठी न उघडल्यामुळे प्रवाहाचे बेफाम पसरणे आणि प्रकल्पासाठी झालेल्या जंगलतोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडणे ही कारणेसुद्धा आहेत, हे लेखिकेने ठामपणे मांडले आहे.


शेवटी उत्तर ध्रुवावरच्या सफरीचे वर्णन आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे आपण खरोखरच ३०-४० वर्षांनी बर्फविरहित होऊ का, असा प्रश्न विचारून तिने पुस्तक संपवले आहे.

पुस्तक वाचताना हे जाणवत राहते की हे पुस्तक काही आयव्हरी टॉवर-मध्ये बसून संगणकावर संशोधन करून लिहिलेले नाही, तर बदरपूरपासून उत्तर ध्रुवापर्यंत अनेक ठिकाणी प्रवास करून अनुभवकथन केले आहे. ही हरित युद्धे लढताना तिचा एकच दृष्टिकोन होता, एकच ध्येय होते, ते म्हणजे पर्यावरण संरक्षण आणि पृथ्वीला वाचवण्याचा प्रयत्न. मग तिने स्वतःच्या कुटुंबाचा विचार केला नाही, की प्रकृतीचा केला नाही. धमक्यांना जुमानले नाही आणि जीवघेणे धोके पत्करले.

✦

## राजेन्द्र खेर लिखित
## दोन नवीन पुस्तके






रामायणात सीतेला पळवलं गेलं...
महाभारतात राज्य हिरावलं गेलं...
तर या कथेत राजाच पळवला गेला...
वत्सदेशाचा संगीतकार राजा उदयन
याच्या सुंदर ऐतिहासिक पर्वाचं
पुनरुज्जीवन करणारी कादंबरी

**उदयन**

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

---





एक रहस्यमयी हस्तलिखित...
एक रहस्यमयी तळं... आणि दोन गटांची
रस्सीखेच... वास्तवाकडून अद्भुततेकडे
नेणारी राजेन्द्र खेर यांची २००५ सालच्या
हॅक्ने लिटररी पुरस्काराने सन्मानित कादंबरी

**बिंदुसरोवर**

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तक परिचय




# छोट्या शहराचा दर्या

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**अनीस सलिम**

अनुवाद

**सुनीता कट्टी**

## स्थलांतराच्या अंतःवेदना उलगडणारी कादंबरी...

सुंदर, खिळवून टाकणारं, वेधक आणि वेगळं पुस्तक. अनीस सलिम यांनी लिहिलेल्या 'द स्मॉल-टाऊन सी' या पुस्तकाचा हा मराठी अनुवाद म्हणजे 'छोट्या शहराचा दर्या.'

'छोट्या शहराचा दर्या'चा नायक आहे एक तेरा वर्षांचा मुलगा. त्याचं आत्तापर्यंतचं जीवन एका धावपळीच्या, घाईगर्दीच्या मोठ्या शहरात गेलेलं आहे. तिथून ते उखडलं जाऊन त्याच्या वडिलांच्या मूळ शहरात रुजवलं जात आहे; पण या प्रवासात त्या मुलाची होणारी भावनिक घालमेल आणि स्थलांतराच्या घुसमटीचा पट या कादंबरीत मांडला गेला आहे.

कादंबरीत एक वेगळाच प्रदेश दाखवल्यामुळे काही शब्दांची सवय व्हायला थोडा वेळ लागतो. अप्पा ऐवजी वप्पा, अम्मा ऐवजी उम्मा (जे खरं अम्माच आहे), आजी ऐवजी वप्पम्मा इत्यादी. सुरुवातीपासूनच पुस्तक वेगळं आहे. मिस्टर अनविन यांना लिहिलेल्या पत्राने पुस्तकाची सुरुवात होते. हेच पत्र पुढे २५० पानं सुरू राहतं. पुस्तकाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात तेरा वर्षांच्या मुलाचे वडील मरणासन्न अवस्थेत आहेत. त्यामुळे पुस्तक बऱ्यापैकी त्यांच्या भोवती फिरतं. प्रसंग साधेच, रोजच्या जीवनातले; पण त्यातला अर्थ जाणवतो. त्यात त्या तेरा वर्षांच्या मुलाची मानसिकता प्रकर्षाने पुढे येते.

मोठ्या शहरातून छोट्या शहरात रुजवलं जाण्याच्या प्रक्रियेत बिलाल नावाचा एक अनाथ मुलगा नायकाचा जिगरी दोस्त बनतो. बिलाल शहराच्या स्थानिक मशिदीने चालवलेल्या अनाथालयात राहत असतो. बिलाल आणि नायक गुपचूप काही धाडसी उद्योग करतात. नायकाचे वडील कादंबरीकार आहेत. ते दुर्धर आजाराने ग्रस्त आहेत. आणि मृत्यूची चाहूल लागल्यावर ते आपल्या जन्मगावी हट्टाने येऊन राहतात. जिथे पहिला श्वास घेतला तिथेच शेवटचा श्वास घ्यावा म्हणून... ज्या शहरात आपण लहानाचे मोठे झालो, तेथील समुद्राचा आवाज कानावर पडत आपल्याला मरण यावे, अशी त्यांची इच्छा असते. आणि ते तसेच जातात. त्यांच्या माघारी पुस्तकाचा दुसरा टप्पा सुरू होतो.

मुलाची आई नाइलाजाने दुसरं लग्न करते. वर्ष - दोन वर्षांच्या मुलीला घेऊन ती नवीन नवऱ्याबरोबर रियाधला निघून जाते. मुलगा आजीबरोबर राहू लागतो. या नव्या बदलासोबत या तेरा वर्षांच्या नायकाच्या आयुष्यात नवी आव्हानं येतात. ही कादंबरी अनपेक्षित वळणं घेत वाचकाला बांधून ठेवते.

✦


# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* इतर पुस्तके २०% सवलतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.


फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

## नवी संहिता... नवा आशय...

अनेक अंधकारमय आयुष्यांना प्रकाशकिरण देणारे...
राष्ट्रीय नेत्रदान चळवळीचे प्रणेते... तीन पिढ्यांमध्ये नेत्रहीनांच्या सेवेचं व्रत रुजवणारे पद्मश्री डॉ. अरविंद व्ही. यांचा प्रेरणादायी जीवनपट





# दृष्टिदाता

**पवित्रा मेहता । सुचित्रा शेणॉय**

अनुवाद : **ऋजुता खरे**

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

महागाईच्या मानवनिर्मित संकटाचं मानवनिर्मित निरसन...
महागाईचा चक्रव्यूह भेदण्याचा मूलमंत्र





# महागाई एक चक्रव्यूह

**हिमसागर जयवंत ठाकूर**

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकपरिचय




# साद घालते कालाहारी

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**मार्क** आणि **डेलिया ओवेन्स**

अनुवाद

**मंदार गोडबोले**

**निव्वळ एक जोडी कपडे घेऊन धरतीवरच्या सर्वांत मोठ्या अस्पर्शित वाळवंटात आयुष्याची सात वर्षं घालवणारं एक अद्‌भुत जोडपं...ज्यानं कालाहारीच्या वाळवंटातलं अनभिज्ञ प्राणिजीवन जगासमोर आणलं, अशा मार्क आणि डेलिया ओवेन्सचे चित्तथरारक अनुभवकथन...**

मानवाच्या कोणत्याही संपर्कात व प्रभावाखाली न आलेल्या वन्यजीवनाचे संशोधन करण्याची मार्क आणि डेलिया ओवेन्स या तरुण जोडप्याला ओढ लागते, नुसती ओढ लागते नाही तर ती ओढ झपाटून टाकते. आफ्रिकेत बोट्स्वाना देशात अशा दुर्गम ठिकाणाचा शोध घेत भटकल्यानंतर, शेवटी हे दोघे मध्य कालाहारी वाळवंटात एक जागा निवडून स्थिरावतात. बरोबर थोडेसे डॉलर, एक थर्डहँड गाडी, एक तंबू, थोडी भांडी आणि बदली कपड्यांचा एक जोड एवढेच सामान. वन्यजीवनाची अतोनात ओढ आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच काय ती बरोबर पुंजी.

अशा परिस्थितीत हे जोडपे तब्बल सात वर्षे तिथे राहिले. कालाहारी वाळवंटातील तीव्र हवामानाचा सामना तिथले वन्यप्राणी कसे करतात, याचा या दोघांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. उन्हाळ्यात दुपारी पन्नास अंशापर्यंत चढणारे तापमान, हिवाळ्यात कडाक्याची थंडी, कधी कित्येक वर्षांत न पडणारा पाऊस, तर थोड्याशा पावसानेदेखील येणारा प्रचंड पूर, अशा प्रकृतीच्या नाना तऱ्हा.

तंबूत राहू लागल्यावर तंबूच्या पातळ कापडापलीकडे रात्री आलेले गुरगुरणारे सिंह, अशी जरी त्यांच्या कालाहारीच्या वास्तव्याची सुरवात झाली असली तरी पुढे मात्र त्याच सिंहांच्या कळपाला यांची इतकी सवय होऊन जाते की सर्व तंबूंमधून त्या कळपातील सिंहाचा मुक्त संचार सुरू होतो. फक्त कालाहारीमध्ये आढळणाऱ्या ब्राऊन हायनाचे (एका प्रकारचे तरस) अभूतपूर्व संशोधन या जोडप्याने केले. त्या तरसांचे सामाजिक जीवन कसे असते, हे पहिल्यांदाच जगासमोर प्रकाशात आणले. या तरसाच्या कुटुंबाला त्यांची इतकी सवय झाली की ते रोज येऊन त्यांच्या तंबूत यांना भेटू लागले. त्यांच्या तंबूंना सावली देणारे झाड एका बिबट्याचे वसतीस्थान होते, तो

बिबट्या बऱ्याच वेळेला त्यांच्या दारासमोरच एका लोंबत्या फांदीवर आरामात झोपी जात असे. त्याची शेपटी दारापुढे खाली लोंबत असे. त्यांना तंबूत जाताना ती शेपटी हाताने बाजूला सारून आत जावे लागे.

अशा थक्क करणाऱ्या प्रसंगांनी पुस्तकाची पानेच्या पाने भरलेली आहेत; पण वाचकांना केवळ आश्चर्यमुग्ध करून सोडण्याचा लेखकांचा उद्देश नाही. ना हा त्यांच्या संशोधनाचा शोधनिबंध आहे, तो दुसरीकडे प्रकाशित झाला आहे. अपरंपार प्रतिकूल परिस्थितीला तोडक्या सामुग्रीच्या आधारे केवळ दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर सामोरे जाऊन त्यांचे तिथले सात वर्षांचे वास्तव्य कसे झाले ते अतिशय साध्या शब्दांत वाचकांपुढे आणण्याचा लेखकांचा प्रयत्न आहे.

पुढे ते जसे जसे संशोधन करू लागले तशी कालाहारीच्या वाळवंटात देखील गुरांना चरण्यासाठी कुरणे तयार करायला ठिकठिकाणी कुंपणे घातलेली त्यांना आढळून आली. या अशा कुंपणांमुळे, तिथल्या प्राकृतिक वन्यजीवांचा लाखो वर्षांचा पाण्याचा, गवताचा मार्ग बंद झालेला त्यांना आढळून आला. कुंपण पार करून पाण्यापाशी न पोहोचल्यामुळे अक्षरश: तडफडून मेलेल्या हजारो हरणांचे वर्णन ऐकून आपल्याही डोळ्यांत पाणी उभे राहते. या हरणांचे तडफडणे हाच कालाहारीचा आक्रोश आहे. धनदांडग्यांच्या चार क्षणाच्या मस्तीसाठी अपरिमित शिकारीचे परवाने दिले गेलेले, त्यात शिकार झालेले उमदे नर सिंह मारले गेल्यामुळे, पूर्ण कळपाचे ताळतंत्र बिघडून जाते आणि आपलेही हृदय गलबलते.

अविचाराने, दृष्टिहीन सरकारच्या धोरणांमुळे, केवळ नजीकच्या लाभासाठी, अनादि काळापासून तिथल्या नाजूक प्रकृतीशी जुळवून घेतलेल्या प्राणीसृष्टीचा कसा नाश होतो आहे, हे सर्व जगाला कळावे, आणि या समाजप्रबोधनातून काही जागृती होऊन त्याचा फायदा तिथल्या वन्यजीवन संवर्धनात व्हावा म्हणून मार्क आणि डेलिया परत येतात, आणि हे पुस्तक आणि शोधनिबंध लिहितात. सुजाण भारतीय वाचकाला, यातील असे प्रसंग वाचून आपल्या देशातही घडलेल्या अशाच घटनांची आठवण अंतर्मुख करून सोडल्याशिवाय राहणार नाही. लेखकांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीतून, त्यांच्या वन्यप्राणीप्रेमातून आपल्यालाही प्रेरणा मिळाल्याशिवाय राहणार नाही.

✦

## संकीर्ण



**अर्ल स्टॅन्ले गार्डनर** नाव ऐकलं आहे का तुम्ही... नसेल ऐकलं... पण पेरी मेसन जरूर ऐकलं असेल. तर पेरी मेसन हे गार्डनरचं बाळ.. ते बाळ इतकं नावारूपाला आलं की जणू गार्डनरचं नाव बदलून पेरी मेसन झालं. पेरी मेसन म्हणजे कोर्टरूम ड्रामातला बाप माणूस. आणि यानं एक-दोन नव्हे तब्बल ऐंशी-एक केसेस अफलातूनपणे हाताळल्या आहेत.

तर हे महाशय चाळीसच्या दशकात उदयाला आले आणि आजही जगातील बेस्ट सेलर्स यादीत अव्वल स्थानावर आहेत. मर्डर ट्रायलमधला खुन्याचा तपास लावावा तर तो पेरी मेसननं. पुस्तकाच्या पानागणिक वाढत जाणारी उत्कंठा आणि पेरीची थक्क करणारी भाषिक कौशल्यं...टेन्शनसोड गुंगवून ठेवणारं काही वाचायचं असेल, तर पेरी मेसनला हक्कानं जवळ करावं..'You're a better detective than you are a lawyer. When you turn your mind to the solution of a crime, you ferret out the truth.' हॅमिल्टन बर्गर The Case of the Caretaker's Cat पुस्तकात पेरी मेसनला जे म्हणतात, तसाच मेसन आपल्या नजरेसमोर कारनामे करत राहतो...तर जरूर वाचा... मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित अर्ल स्टॅन्ले गार्डनर यांची अनुवादित पुस्तके.







**१६ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२० दरम्यानचा दिनविशेष**

**दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान खास सवलत**

**१६ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन**

'नाथ हा माझा...', 'रेशीमगाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५६५/- । सवलत किंमत ४१९/-**

---

**१६ सप्टेंबर - कमलाबाई ओगले यांचा जन्मदिन**

'रुचिरा भाग १', 'रुचिरा भाग २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३८९/-**

---

**१७ सप्टेंबर - अनंत पै यांचा जन्मदिन**

'आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र', 'आत्मविश्वासाचा कानमंत्र', 'उत्तम स्मृतीचा कानमंत्र', 'यशाचा कानमंत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

---

**१८ सप्टेंबर - लान्स आर्मस्ट्राँग यांचा जन्मदिन**

'इट्स नॉट अबाउट द बाइक' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**१९ सप्टेंबर - शरद दळवी यांचा जन्मदिन**

'चित्रमय बोधकथा भाग १(तीन पुस्तकांचा संच)', 'चित्रमय रंगतदार कथा मालिका भाग १०', 'चित्रमय रंगतदार कथा मालिका भाग ११', 'एकलव्य', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९८५/- । सवलत किंमत ६१९/-**

---

**२१ सप्टेंबर - स्नेहल जोशी यांचा जन्मदिन**

'नीलकंठ', 'प्लँचेट', 'तळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९३/-**

---

**२१ सप्टेंबर - ख्रिस गेल यांचा जन्मदिन**

'सिक्स मशिन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२१ सप्टेंबर - दीपा पोरे यांचा जन्मदिन**

'ज्ञानदा निबंधमाला' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ११०/- । सवलत किंमत ६९/-**

---

**२२ सप्टेंबर - करेन रोझ यांचा जन्मदिन**

'डाय फॉर मी', 'स्क्रीम फॉर मी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९८०/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**२३ सप्टेंबर - डी.एस. इटोकर जन्मदिन**

'A to Z विज्ञान', 'छंदातून विज्ञान', 'फक्त खेळण्यांसाठी', 'खेळणीच खेळणी', 'प्रयोग वनस्पती विज्ञानाचे', 'साधी यंत्रे', 'वाचनातून विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'विज्ञानातील गमतीजमती', 'विज्ञानातील रंजकता' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०९५/- । सवलत किंमत ५९९/-**

---

**२३ सप्टेंबर - रेई किमुरा जन्मदिन**

'जॅपनीज रोझ', 'जॅपनीज ऑर्किड', 'जॅपनीज मॅग्नोलिया', 'मी एरिक', 'आवा मारू - टायटॅनिक ऑफ जपान', 'अ नोट फ्रॉम इचियो', 'वादळफूल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५२०/- । सवलत किंमत ७९९/-**

---

**२६ सप्टेंबर - दिलिप दोंदे यांचा जन्मदिन**

'सागरी परिक्रमेचा पराक्रम' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७३/-**

---

**२९ सप्टेंबर - निर्मला मोने यांचा जन्मदिन**

'चित्रमय रंगतदार कथा भाग १३', 'जादूचं रबर आणि इतर गोष्टी,

जादूचं बटण, जादूचं तळं', 'जंगल जंमत मालिका भाग २, 'पंचतंत्रातील गोष्टी (पाच पुस्तकांचा संच)', 'जॅपनिज मॅग्नोलिया' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५१०/- । सवलत किंमत ८४६/-**

---

**२९ सप्टेंबर - जागतिक हृदय दिन**

'चला जाणून घेऊ या! हार्ट ॲटॅक', 'हृदयविकार निवारण', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'चला जाणून घेऊ या! शाकाहार', 'चला जाणून घेऊ या!ध्यानसाधना', 'चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६४० - । सवलत किंमत ३४९/-**

---

**३० सप्टेंबर - एली वायझल यांचा जन्मदिन**

'नाइट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत ११९/-**

---

**३० सप्टेंबर - जागतिक अनुवाद दिन**

सर्व अनुवादित पुस्तकांवर ३३.३३ टक्के सवलत

**(किमान खरेदी १०००रु.)**

---

**खालील संचांवर १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत**

**१ ऑक्टोबर - उमा कुलकर्णी यांचा जन्मदिन**

'संवादु अनुवादु', 'केतकरवहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ३८९/-**

---

**१ ऑक्टोबर - अपर्णा वेलणकर यांचा जन्मदिन**

'फॉर हिअर, ऑर टू गो?' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**२ ऑक्टोबर - गांधी जयंती**

'दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी', 'लेट्स किल गांधी!', 'महात्मा गांधी आणि तीन माकडे', 'मोहनदास', 'फ्रिडम अॅट मिडनाइट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २३००/- । सवलत किंमत १३६९/-**

---

**३ ऑक्टोबर - गुरुचरण दास यांचा जन्मदिन**

'द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४४९/-**

---

**८ ऑक्टोबर - तहमिमा अनम यांचा जन्मदिन**

'आहे कट्टर तरी...', 'तेच दिन सोनेरी...', 'झुबेदा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ८०९/-**

---

**९ ऑक्टोबर - सुधा मेनन यांचा जन्मदिन**

'आघाडीचे महिला नेतृत्व', 'दिव्यगुणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५७५/- । सवलत किंमत ३८९/-**

---

**१० ऑक्टोबर - आर.के. नारायण यांचा जन्मदिन**

'हलवाई', 'वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३८९/-**

---

**१२ ऑक्टोबर - शान्ता शेळके यांचा जन्मदिन**

'आंधळी', 'आंधळ्याचे डोळे', 'अनोळख', 'अनुबंध', 'चौघीजणी', 'गवती समुद्र', 'गोंदण', 'कविता स्मरणातल्या', 'किनारे मनाचे', 'लेखक आणि लेखने', 'मेघदूत', 'निमित्तानिमित्ताने...', 'पावसाआधीचा पाऊस', 'पूर्वसंध्या', 'रंगरेषा', 'रेशीमरेघा', 'सांगावेसे वाटले म्हणून', 'संस्मरणे', 'सुवर्णमुद्रा', 'वर्षा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २९७५/- । सवलत किंमत १७५९/-**

---

**१२ ऑक्टोबर - प्रोतिमा बेदी यांचा जन्मदिन**

'टाईमपास' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-**

**१४ ऑक्टोबर - डॉ. अरुण मांडे यांचा जन्मदिन**

'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ११९/-**

**१५ ऑक्टोबर - डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती**

'अदम्य जिद्द', 'माझी जीवनयात्रा...', 'टर्निंग पॉइंट्स', 'योद्धा शास्त्रज्ञ राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६२०/- । सवलत किंमत ३९९/-**

**१५ ऑक्टोबर - मारिओ पुझो यांचा जन्मदिन**

'ओमेर्ता' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

**१५ ऑक्टोबर - अविनाश भोमे यांचा जन्मदिन**

'कसं बोललात! (७ पुस्तकांचा संच)', 'तुम्ही अन् तुमची मुलं!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७८५/- । सवलत किंमत ४७९/-**

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२

**Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**

आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.

**author@mehtapublishinghouse.com**

# ग्रेटाची गोष्ट

लेखक : **जोसेफ तुस्कानो**




**ग्रेटा थनबर्ग** या चिमुरडीने उभारलेल्या आंदोलनाने साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले आणि पर्यावरण रक्षणाचा एल्गार उभा राहिला. जगभरचे पर्यावरणप्रेमी तिच्या या मोहिमेशी जोडले जात आहेत. ग्रेटाचा हा प्रेरणादायी लढा **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**तर्फे पुस्तकरूपात आला आहे.

खास बच्चेकंपनीसाठी या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली असून कोल्हापूर येथे प्रसिद्ध अभिनेते आणि वृक्ष संवर्धनाच्या कामी स्वतःला झोकून देऊन काम करणारे व्यक्तिमत्त्व असणारे **सयाजी शिंदे** यांच्या हस्ते या पुस्तकाचे अनावरण झाले.

**लोकमत** १३ ऑगस्ट, २०२०

**सयाजी शिंदे : ग्रेटा थनबर्गच्या मराठी व्हिडिओचे लोकार्पण**

## सर्वांत जुनी झाडे हेच आपले सेलिब्रिटी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** झाडांचे वाढदिवस साजरे व्हायला हवेत व प्रत्येक गाव, तालुक्यातील सर्वांत जुनी झाडे हेच त्या-त्या भागांतील आपले सेलिब्रिटी आहेत, असे मत अभिनेते आणि सह्याद्री वनराई वृक्षचळवळीचे प्रणेते सयाजी शिंदे यांनी बुधवारी व्यक्त केले.

'जागतिक युवा दिना'चे औचित्य साधून कोल्हापुरातील 'फ्रायडेज फॉर फ्युचर' या संस्थेमार्फत आप्पाज कॉम्प्लेक्स येथील कार्यक्रमात स्वीडनमधील पर्यावरण आंदोलक ग्रेटा थनबर्ग हिच्या गाजलेल्या भाषणांचा मराठीतील पहिल्या व्हिडिओचा लोकार्पण सोहळा सयाजी शिंदे यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी सयाजी शिंदे म्हणाले, पर्यावरणाविषयी ग्रेटासारख्या लहान मुलांनी मोठ्यांना वास्तवाची जाणीव करून द्यायची वेळ आपण आणली आहे, हे दुःखदायक आहे. स्वीडनमधील मुलांनी हे करून दाखविले. आपल्या देशात अनेकांनी निसर्ग वाचविण्यासाठी आंदोलने केली आहेत; त्यामुळे प्रत्येकाने स्वतःपासून बदलास सुरुवात करावी, असे आवाहन सयाजी यांनी केले.



कोल्हापुरात बुधवारी ग्रेटा थनबर्ग हिच्या भाषणांचा मराठीतील व्हिडिओचा लोकार्पण सोहळा सयाजी शिंदे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी सिद्धार्थ शिंदे, सुहास वायंगणकर, फ्रायडेज फॉर फ्युचरचे नितीन डोईफोडे उपस्थित होते.


**Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. CSO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/09/2020 Posting Date : 11/09/2020

## नवीन संहिता... नवा आशय...






















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________

______________________

______________________

______________________